

जॉयस्टिक
सोनाली नवांगुळ



# जॉयस्टिक

सोनाली नवांगुळ

**मा ऊ स** मल्टिमीडियाचं प्रकाशन

# जॉयस्टिक

## सोनाली नवांगुळ

**पहिली आवृत्ती :** २६ ऑगस्ट २०१८

**मुखपृष्ठ, रेखाचित्रं, मांडणी :** रेश्मा बर्वे


**प्रकाशक :** अमृता वाळिंबे
माऊस मल्टिमीडिया
एस १, निर्मिती क्लासिक कॉम्प्लेक्स
५५५/२ प्लॉट नं १, मोरेवाडी रोड
राजेंद्रनगर, कोल्हापूर ४१६ ००४
संपर्क : ९७ ६७ ५८ ५७ ०७
marathimouse@gmail.com
walimbeamruta@gmail.com


**मुद्रण स्थळ**
भारती मुद्रणालय
८३२, ई वॉर्ड, शाहूपुरी, चौथी गल्ली
कोल्हापूर ४१६ ००१

© सोनाली नवांगुळ
ए एफ १, आनंदवन विहार, ७३३/५ ए वॉर्ड
श्री हॉस्पिटलजवळ, नाळे कॉलनी
कोल्हापूर ४१६ ००७
संपर्क : ९७६७९५१९०५
sonali.navangul@gmail.com

**मूल्य : १०० रुपये**

झाड होऊया... झाड – १
सुध्या – १०
गोष्टीची गोष्ट – २०
मन्यांशी मनमिळवणी – ३३
बघता बघता... – ४२
दिपूचं गणित – ५३
जॉयस्टिक – ६२





# झाड होऊया... झाड

जुई आणि चिनार यांची अगदी घट्टमुट्ट मैत्री होती. अमोरासमोरच घरं होती त्यांची. शाळेत दोघंही बरोबरच जायची. शाळेतून आल्यावर कडाड्काड असा आवाज होऊन पोटात भूक लागलेली असायची... मग ज्या घरी आवडतं काही मिळेल तिथंच मस्त ताव मारायचा... कधी जुई चिनारकडे तर कधी चिनार जुईकडे हे ठरलेलंच. संध्याकाळी जुई गाण्याच्या क्लासला जायची तर चिनार हार्मोनियमच्या क्लासला जायचा... मात्र क्लासहून येताना दोघंही एकमेकांना सोबत करायची. घरी आल्यावर 'पाचच मिनिटात येतो' म्हणून दोघंही चिंचेच्या झाडांपलीकडे असणाऱ्या छोट्या बागेत खेळायला पळायची. फक्त झोके घेऊ असं ठरवलं असलं तरी घसरगुंडी व्हायचीच, सी-सॉ चुकवायला तर आवडायचाच नाही... मग बाकीचं मित्रमंडळ पाहिल्यावर थोडी लपाछपी किंवा पकडापकडी असं खेळल्याशिवाय काही मजाच नाही ना! नंतर घरातून हाका आल्या की धूम पळत आपापल्या घरी जायचं. हात-पाय धुवायचे. देवाला नमस्कार करायचा. त्यानंतर कधी आई तर कधी बाबा अभ्यास करून घ्यायला सुरुवात करायचे... अभ्यास संपवून जेवायचं तर शेवटचे काही घास ताटात राहिलेले असतानाच जाम झोप यायला लागायची. अंथरुणावर पडेपर्यंत दम काही निघायचा नाही. आणि झोपतोय तोवर चिमणीची चिवचिव, मांजरीची म्याव म्याव आणि आईबाबांच्या हाका ऐकून उठायचं... मग दात घासणं, दूध पिणं, अंघोळ, राहिलेला असेल तर अभ्यास किंवा शाळेतून करायला आणलेलं इतर काम इतक्यात साडेनऊ वाजायचेच. मग पटकन जेवायचं की शाळेला पळायचं!

असं रोजचंच झालं होतं चिनार आणि जुईचं. जुई आणि चिनार शहाणी मुलं होती. शेजारचेही आपल्या मुलांना सांगायचे की, ''बघा... बघा... किती शहाणी मुलं आहेत. आईबापाला दमवत नाहीत. अभ्यास करतात. उलटं बोलत नाहीत.'' खरं तर अशा कौतुकाचा कुणालाही आनंदच होतो,

पण चिनार आणि जुईला मात्र वाईटच वाटायचं... कधी कधी तर रडूसुद्धा फुटायचं.

जुईची आई वाचनालयात कामाला जायची आणि बाबा घरातल्या हॉलमध्ये मुलांची शिकवणी घ्यायचे. खूप म्हणजे खूपच मुलं-मुली त्यांच्याकडे शिकायला यायची. चिनारची आई व बाबा दोघंही एक छोटं हॉटेल चालवायचे. दोघंही दिवसभर या ना त्या कामात गुरफटलेले असायचे. आई-बाबांची कामांची धांदल चिनार आणि जुई दोघांनाही कळायची... त्या दोघांनाही आपले आईबाबा खूप आवडायचे... दोघांचेही आईबाबा भेटले की एकमेकांच्या मुलांचं कौतुक करत. म्हणत, ''मोठी गुणी बाळं आहेत हं आपली!''

अलीकडे हुशार, गुणी, चांगली असं कोणी कौतुकानं म्हटलं की चिनार-जुई हिरमुसायची. अशाच एका रविवारी भल्या सकाळी चिंचेच्या झाडांपाठीमागच्या बागेत गंभीर चेहऱ्यानं ती दोघंही एकमेकांशी बोलत बसली.

चिनार म्हणाला, ''जुई, काय करूया गं? खूप वाईट वाटतंय, पण काही करताच येईना ना...''

''हो ना रे. किती दमतात आपले आई-बाबा. आपण काहीच मदत करत नाही त्यांना... मनातून वाटूनसुद्धा!'' जुई म्हणाली.

''तरीही आपल्याला लोकांनी चांगलं म्हटलं ना तर मला वाटतं की आपण खोटारडेच आहोत.'' - चिनार

''मलापण तुझ्यासारखंच वाटतं बघ. रडूही येतं. माझी आई घरातली शक्य तितकी कामं करून वाचनालयात जाते. मला जेवायला बाबा वाढतात आणि मग स्वत: जेवून भांडी धुवून ठेवतात. मी शाळेतून येते तेव्हा आई भाजी, दळण घेऊन येत असते. ती यायच्या आधीच बाबा मस्त चहा करतात आणि आम्ही सगळे घेतो. आई पटकन चटमट खाऊ करते, तो खाऊन मी क्लासला पळते आणि बाबा क्लास घ्यायला. मी खेळून आल्यावर आई किंवा बाबा माझा अभ्यास घेतात. आई स्वयंपाक करते. बाबा ताटं घेतात. मग तर बाबा झोप आली म्हणून कळतं; इतक्यात सकाळपण होते. पुन्हा सुरू शाळा, क्लास, खेळ, गृहपाठ, जेवण, झोप.

सकाळ झाल्यावर पुन्हा तेच.'' जुई कळवळत म्हणते.

''हो ना अगं. माझंपण तेच झालंय. हॉटेलात फार काम असतं गं माझ्या आईबाबांना. कधी कधी तर माझा अभ्यास घ्यायलाही वेळ मिळत नाही त्यांना. खूप दमतात ते. त्यांचे पाय दाबून द्यावेत, डोक्याला तेल लावावं, हॉटेलात काहीतरी मदत करावी असं मला वाटतं गं. पण वेळच मिळत नाही. मग तुझ्यासारखाच मला राग येतो कोणी आपल्याला चांगलं म्हटलं की. चांगली मुलं सगळ्यांना मदत करतात. आपण कुठं करतो मदत?'' – चिनार

''आपण क्लासला जातो ना त्या वेळेत एक आजोबा सारखे बागेतल्या मुलांना हाका मारत असतात. 'अरे जरा या, माझं ऐका' म्हणत असतात. त्यांना फार दिसत नाही. संध्याकाळच्या वेळेत तर खूप कमी दिसतं. त्यांना वाटतं की कुणीतरी त्यांना पेपरमधल्या बातम्या वाचून दाखवाव्यात. मला वाटतं रे त्यांची मदत करावी... आणि आमच्या क्लासमध्ये स्वच्छता करायला अंबूमावशी येतात. त्यांनी स्वच्छता केली की मुलं पुन्हा कचरा टाकतात. मला त्यांनाही केर काढण्यात मदत करावी वाटते... शिवाय आईला स्वयंपाकात, भाजी आणण्यात, बाबांना भांडी घासायला, दांडीवरचे वाळलेले कपडे घडी करून ठेवायला मदत करावी वाटते... पण ना वेळच कुठं असतो?'' – जुई

''बाबा आणि आईला मी म्हटलं ना की मी थोडी कोथिंबीर निवडतो, शेंगदाण्याची फोलफटं काढतो तर ते म्हणतात, चिनूबाळा आधी अभ्यास संपव. अभ्यास संपवल्यावर तर झोपच आलेली असते. रोज सकाळी पाटीलआजी फुलं वेचायला येतात तेव्हा मी डोळे चोळत उठतो. त्यांना वाकून फुलं वेचायला त्रास होतो आणि टाचा वर करून झाडाची फुलं काढता येत नाहीत. मनात असूनसुद्धा मदत करता येत नाही. भाजीपाल्याच्या आमच्या छोट्या बागेला तर मी कधीच पाणी घातलेलं नाहीये,'' – चिनार

आपल्या मनातली खंत एकमेकांना बोलून दाखवल्यावर चिनार–जुई दोघांनाही बरं वाटलं... पण रोजरोजचं वाईट वाटणं थांबवायचं कसं यावरचा उपाय काही निघत नव्हता. आता पुढच्या रविवारी उपाय शोधूनच भेटायचं असं ठरवून दोघांनीही एकमेकांना टा टा केलं.

शाळेतल्या चाचणी परीक्षेमुळं तो आठवडा तसा भरभरच गेला. परीक्षा संपल्यामुळे चिनार आणि जुईला शनिवारी रात्री आणखीनच गाढ झोप लागली. सकाळी दोघंही जागी झाली ती दचकूनच! – 'अरे रविवार आलासुद्धा? आपण सगळ्यांना मदत करण्यासाठीचा मार्ग शोधणार होतो... वेळच मिळाला नाही विचार करायला!' असं म्हणतच ठरलेल्या जागी चिनार आणि जुई एकमेकांना भेटले.

''काहीच नाही सुचत ना?'' जुई म्हणाली.


चिनारनं हो म्हणत मान हलवली. इतक्यात वाऱ्याची मस्त झुळूक आली आणि त्या झुळकीबरोबर चाफ्याचा मस्त सुगंध नाकात शिरला. पडायला आलेलं एक फूल वाऱ्याच्या झुळकीनं टपाक्कन चिनारच्या डोक्यावर पडलं... चिनारनं ते हातात घेतलं. जुईनंही मग फुलांच्या सड्यावर नजर टाकली.

... दोघांच्या डोक्यात एकाचवेळी काहीतरी चमकलं!

– झाड कोणतंही असो किती उपयोगी पडतं. फुलाचं झाड असेल तर ते छान वासाची फुलं देतं. आपल्या अवतीभवती मस्त वासानं मजा आणतं. काही झाडांची मुळं उपयोगी, काही झाडांची खोडं उपयोगी, काही झाडांची तर मुळं, खोडं, पानं, फुलं, फळं असं सगळंच उपयोगी. झाडं सावलीसुद्धा किती गारेगार देतात. जमिनीत त्यांची मुळं मातीला घट्ट धरून ठेवतात त्यामुळे माती वाहून जात नाही, तिची धूप होत नाही. झाडावर कित्ती पक्षी घरटं करतात. झाडांपासून औषधंही तयार होतात म्हणे! बागेतल्या झाडावरचा झोका तर केवढा मस्ताय. आपल्याला झाडच होता आलं तर सगळ्यांच्या किती उपयोगी पडता येईल. ठरलं तर मग... कसंही करून झाड व्हायचं आपण! जुई आणि चिनार यांनी हा विचार एकाचवेळी एकमेकांना बोलून दाखवला.

ठरवलं खरं; पण झाड व्हायचं कसं? कोण सांगणार युक्ती? देवळात जाऊन प्रार्थना केली तर देव आपल्याला झाड बनवेल का? गावात भैरू जादूगार आलाय... त्याला भेटून होईल का काम? असे खूप खूप प्रश्न जुई आणि चिनारच्या मनात टपाटपा उगवले. दोघांनीही जादूगाराला गाठलंच.


''काय रे पोरांनो ऽऽ काय हवंय?'' भैरू जादूगाराने विचारलं.



''आम्हाला झाड व्हायचंय आणि सगळ्यांना खूप मदत करायचीये. तुम्ही आम्हाला झाड बनवा ना! प्लीज, प्लीज, प्लीज!''

भैरू जादूगार या मागणीनं चक्रावला. तो म्हणाला, ''मी तुम्हाला टोपीतून कबूतर काढून दाखवू शकतो, रिकाम्या हातातून भस्म किंवा अंगठी किंवा चॉकलेट काढून दाखवू शकतो. पत्त्यांची जादू दाखवू शकतो. चालेल?''

''नक्को, नक्को! आम्हाला झाड म्हणजे झाडच व्हायचंय! मोठ्ठं!'' – चिनार, जुई म्हणाले.



भैरू जादूगारानं समजूत घालायचा खूप प्रयत्न केला पण चिनार, जुई आपल्या म्हणण्यावरून हटेचनात. शेवटी जादूगाराला कबूल करावं लागलं... ''अरे बाबांनो, जादू वगैरे काही नसते. असं एका सजीवाचं दुसऱ्या सजीवात रूपांतर नाही करता येत जादूनं. ही जादू म्हणजे हातचलाखी किंवा विज्ञानाचे नियम असतात. आणि विज्ञानाचे नियम, निसर्गनियम तोडून कुठलाच जादूगार काही करू शकत नाही बाळांनो. तुम्हाला झाड बनल्याचा अनुभव घ्यायचा असेल तर एक करता येईल... तुम्हाला संमोहित करता येईल म्हणजे हिप्नोटाईज करता येईल. मी ते केल्यावर तुमची तंद्री लागेल... त्या तंद्रीत मी जे म्हणेन तेच खरं असं तुम्हाला वाटेल. मी तुम्हाला 'तुम्ही झाड आहात' असं सांगितलं तर तुम्ही तसा विचार करायला

लागाल. आहात तयार?''

''हो ऽऽऽऽऽऽऽऽऽ''

भैरू जादूगारानं पटदिशी एक लंबक आणला व त्याच्याकडे एकटक पाहायला सांगितलं जुई-चिनारला. ते दोघं पाहातच राहिले... पाहातच राहिले... आणि...

आता चिनार होता चिंचेचं झाड आणि जुई चाफ्याचं. अंगभर पसरलेल्या फांद्याच फांद्या... डहाळीवर बसलेले पक्षी, त्यांची घरटी... झाडाखाली उभे असलेले लोक. मस्तच होतं सगळं.

चिनार चिंचेचं झाड बनून सगळं पाहात होता. इतक्यात त्याला जोराची तहान लागली. चिंचेचं झाड स्वत: पाणी आणून कसं पिणार बरं! आणि हे झाड तर बागेजवळ होतं, बागेत नव्हतं... यामुळं त्याला बागेचा माळी पाणी नव्हता घालणार! ''आपल्यालाच काहीतरी हात-पाय सॉरीऽऽ सॉरी... फांद्या, मुळं... उपमुळं हालवावी लागणारसं दिसतंय...'' चिनार मनात म्हणाला.

जमिनीच्या पोटातलं पाणी पिण्यासाठी जमिनीच्या आत हळूवार हालचाल करून चिंचेच्या मुळांनी थोडंसं पाणी मिळवलं. ''छे! दम लागला! सर म्हणत होते की भूजल पातळी खालावलीय. म्हणजे काय हे आत्ता कळलं. जमिनीत खोल जाऊनही मुळांना पोटभर पाणी मिळत नाहीये...'' चिनार म्हणाला. त्याला बागेत चाफ्याचं झाड झालेली जुई दिसत होती.



‘‘अरे ऽऽ आजोबा बसलेत खाली. नेहमीप्रमाणे एकटेएकटे. जरासं हालून माझी फुलं टाकू का आजोबांवर... खूश होतील ते!’’ चाफ्यांचं झाड झालेली जुई मनात म्हणाली. तिनं फुलं टपटपवली... एका फुलाचा आजोबांनी वास घेतला, ते खिशात टाकलं आणि परत उदास बसून राहिले. इतक्यात भेळीचे कागद आणि आईस्क्रीमचे कप मुलांनी तिच्याखाली टाकले. ती ओरडली, ‘‘एऽऽ टाकू नका कचरा. माळीदादा माळीदादा... धरा हो त्या मुलांना...’’ पण तिचा आवाजच निघाला नाही त्यांना रागवायला आणि तिनं मारलेली हाक माळीदादांपर्यंतही नाही पोचली.

संध्याकाळ होत आली होती. उजेड फिकट फिकट होत चालला होता. आपापली कामंधामं संपवून पक्षी झाडावरल्या आपल्या घराकडे परत येत होते. बागेतल्या चाफ्याला व बागेबाहेरच्या चिंचेला एकमेक दिसत होते पण बोलता येत नव्हतं. दोघांच्या मनात एकच विचार चालू होता... आपण नेहमीप्रमाणे शाळेतून घरी वेळेवर नाही पोहोचलो तर घरी काय गोंधळ उडेल? हातातली कामं सोडून आईबाबांची आपल्याला शोधायचीच धावपळ सुरू होईल? आपण कशावरतरी रुसल्यामुळे घरी नाही आलो की काहीतरी अडचणीत सापडलो असं वाटेल त्यांना? जरी सगळ्यांना मदत करण्यासाठी झाड झालोय आपण; तरी आपण कुठं मदत करू शकतोय सगळ्यांना; उलट आपण वेळेवर न दिसल्यामुळं त्रासच होईल त्यांना! नसती कटकट होईल! चिंच व चाफ्याचं झाड बनलेल्या चिनार-जुईचा असा विचार चालूच होता तोवर चिनारला जुईची आई दिसली .. हातात भाजीची पिशवी घेऊन ती भराभरा घराकडे चालली होती. त्यानं सगळी ताकद गोळा करुन हाक मारली... ‘‘काकूऽऽऽ काकूऽऽऽ आम्ही इकडंय... ओ काकू ऽऽ’’

छे!! हाक पोहोचलीच नाही... फक्त पानं हालली आणि चार चिंचा टपटपून खाली पडल्या...


‘‘अरे पोरांनो... जागं व्हा... भानावर या...’’ कुणाच्यातरी हाका चिनार आणि जुईच्या कानापर्यंत पोचल्या. हळूहळू डोळे उघडले त्यांनी तर काय! समोर भैरू जादूगार!! दोघांनी झोपेतनं उठल्यासारखे डोळे चोळले व आधी स्वत:च्या हातापायांकडे आणि एकमेकांकडे बघितलं. घशातून कसले कसले आवाज काढून-ओरडून बघितलं. सगळं ठाकठीक आहे हे

पाहून दोघं नाचायला लागले. भैरू जादूगार गमतीनं त्यांच्याकडे बघत म्हणाला, ''काय रे सोंड्यांनो... केली का मदत सगळ्यांना झाड होऊन? अजून करायची का?''

''नको... नको... आम्हाला कळ्ळंय सगळं आता.!'' जुई-चिनार म्हणाले.

''झाड होऊन आम्हाला सगळ्यांना मदत करता येते हे खरंय पण आमच्या हातापायांनी, तोंडानी जरा जास्तच पटकन मदत करू शकतो आम्ही. साधं 'कचरा टाकू नका' असंसुद्धा नाही म्हणता आलं मला!'' जुई गडबडीनं म्हणाली.

''ज्याला जे अवयव मिळालेत त्यानं त्याचा उपयोग करून शक्य तितकी मदत करावी एकमेकांना हे पटलंय आता. त्यासाठी मुद्दाम दुसरं काही झालं पाह्यजे असं नैये. खोड, पानं, फुलं, फळं, मुळं हे झाडाचे अवयव. त्या सगळ्यांचा उपयोग करून झाड मदत करतं. हात, पाय, डोळे, बुद्धी, मन यांचा उपयोग करून आम्ही जमेल ते करायला हवं! खरंय!'' चिनार मान डोलवत म्हणाला.



# सुध्या

सुधाकर आजारी असल्यामुळं अमृताताई आणि अर्णवदाच्या घरात सगळं एकदम गप्प गप्प होतं. खरंतर तीन दिवस जोडून सुट्टी मिळालीय... सुध्याबरोबर किती खेळायचं ठरवलं होतं. अमृतातै-अर्णवदानंपण सुट्टी काढली होती. नेमकं ह्या सुध्याला आत्ताच बरं नसायचं होतं! मी त्याचं आवडतं क्रीमचं बिस्किट मुद्दाम घेऊन आले. तोंडाजवळ नेलं तर नुसतंच त्याचं अंग थर्रथर्रलं. अमृताताईनं त्याची आवडती पँट आणि कुर्ता घातला होता. तरी त्याचा मूड येईना झालावता. अर्णवदा फेऱ्या मारत एकदम हळू आवाजात मोबाईलवर बोलत होता. बोलता बोलता त्यानं पायात चप्पल घातली. मला वाटलं की आता काय सुध्या गप्प बसणार नाही. त्याला सुट्टी कळते. आणि सुट्टीच्या दिवशी दादा बाहेर जायला लागला की तो एकदम जोरानं येऊन त्याच्या पायावरून खांद्यावर चढतो. मात्र हॉलचं दार उघडून दादा बाहेर गेला तरी सुध्यानं काहीच हालचाल केली नाही. रंगीबेरंगी रुमालाचं पांघरूण घेऊन तो पडून होता. रुमालावरनंसुद्धा ताईचा एकदम मूड गेलावता. केस गळलेले असतात म्हणून सकाळी उठल्यावर दादानं सुध्याचं अंथरूण बदललं तेव्हा चांगला धुतलेला स्वच्छ पांढरा रुमाल आणून त्याच्या गळ्यापर्यंत पांघरला तर ती एकदम चिडली. दादाला कळलंच नाही काय झालं ते. तिनं तो रुमाल पुन्हा धुण्यात टाकला आणि कपाटाच्या दारांचा मोठ्ठा आवाज करून रंगीत रुमाल काढला. जोराजोरात पाय आपटत बेडरूममध्ये आली. सुध्याला पांघरूण घातलं. दादा बिचारा धपाटा घातल्यासारखं तोंड करून तिलाच थापटायला लागला. तेव्हा ताई म्हणाली, 'कॉफी करते. घोटभर पितो का ते बघूया.'

टीव्हीवर मेलेल्या माणसांचं काही असेल तर पांढरे कपडे घालतात... तसंच काहीतरी अमृतातैला वाटलं असणार आणि घाबरून ती वैतागली असणार... मला माहितीए!

अमृतातै–अर्णवदाकडे आल्यापासून सुध्या त्यांचा मुलगा आहे आणि मी त्याची मैत्रीण. म्हणजे आता असं वाटतंय, पण अर्णवदानं मला उचलून घेतलं की तो मैत्रीबित्री विसरतो आणि मला ओचकारतो. खरंतर त्याच्या खूप आधीपासून दादा–ताई माझे आहेत, पण मी मोठीए म्हणून मलाच समजून घ्यावं लागतं. ताईदादा या घरात येण्याच्या आधी मी, आई–बाबा, चैतूदादू सोसायटीत राहातोय. म्हणून मग त्यांना सोसायटी दाखवायची जबाबदारी मलाच घ्यावी लागली. मी शाळेतपण जात नव्हते तेव्हा सुध्या त्यांच्यात आला. आता मी चौथीत जाणारे थोड्या महिन्यांनी. म्हणजे मी मोठी आहे, मला सगळं समजतं.

खूप खूप आधी एकदा, भरपूर पाऊस पडत होता. आजी मला गॅलरीतून पाऊस दाखवत होती. मला पावसाच्या पाण्यात जायचं होतं. आजीला मला सोडायचं नव्हतं. मग मी रडायला लागले. म्हणजे आजी असं सांगत असते.

''चारू काही बाई आवरंना मला. काही सुचू दिना... हिचे आईबाप हापिसात. मग मी म्हातारी कुठं जाणार लहान पोर घिऊन? शेजारच्यांचाच आधार. म्हणून मी नेलं की हिला अमृताकडं! पण त्या दिवसापास्नं हिचं उसळणं कमी आलं बघा.'' सुधाकर कसा भेटला चारूला; ही गोष्ट येणाऱ्याजाणाऱ्याला आजी सांगते. अगदी मुव्हीस्टोरी सांगितल्यासारखी.



त्या दिवशी आजीनं चारूला उचलून तिचं बोट डोअरबेलवर दाबलं. चारूला बेल स्वत:च वाजवायला आवडायची. दार उघडलं पण अमृता दार उघडून घाईनं बेडरूममध्ये गेली. चारूचे नेहमीप्रमाणं लाड नाही केले. ''तै... चारू गंमत सांगायला आलीय, तिच्याकडं बघत पण नैयेस...'' चारू स्वत:ला चारूच म्हणायची. मी म्हणायची नाही.


कुरकुरत, थपथप पाय आपटत चारू अमृताताईच्या मागून बेडरूममध्ये गेली, तर काय! अमृताताईनं फळांच्या बुट्टीत मऊमऊ अंथरूण करून त्यावर काहीतरी ठेवलं होतं... 'ईईईईऽऽऽऽ उंदीर!' असं म्हणून तिनं बारीक किंकाळी फोडली, पण जीभ चावून 'ई नै..ई नै' म्हणत ती मागे खेचली. एकदम भारी शेफ झालेला रेमी उंदराचा 'रॅटाट्यूई' पाहिल्यापासून कुठल्याच प्राण्याला घाण म्हणायचं नाही असं चारूनं ठरवलं होतं. बाबानंही तिला सांगितलं होतं, की तू झुरळ, पालीला ई म्हणतेस तसं त्यांनी तुला म्हटलं तर चालेल का?

''अमृतातै... उंदराला का झोपवलंय...?''

''शूऽऽऽ हळू आवाजात बोल... झोपलाय तो! खार आहे.''

हळू आवाजाचं सांगूनही चारूला भान राहिलं नाही आणि ती हसली... खारूताई... येस्स!''

''खारूताई नाही. खारूदादा.''



''हॅहॅहॅ... खारूदादा अस्तो का तरी! खारूताईच अस्ते. आज्जीनं मला तिची गोष्टपण सांगितलीय. पूल बांधायला मदत करते ती!''

''अगं हो. डॉक्टरांनी सांगितलंय तसं.'' आणखी काय बोलावं हे अमृताला सुचेना.

''हं... अगं माझ्या 'चिप अॅन्ड डेल' कार्टूनमध्ये दोन मुलगा खार असतात आणि एक मुलगी खार! गंमत! मुलगा खार आणली आपण!''

अमृताला कधी नव्हे ते कार्टून नेटवर्क चॅनलचं महत्त्व कळालं.

चारूनं पाहिलं, अमृतातै कापसाचे गोल गोल बॉल करून ते दुधात भिजवत होती आणि त्या खारीच्या तोंडाशी नेत होती. खार बाळ हळूहळू दूध पित होता.

‘‘मी हात लावू? मी देऊ दूध त्याला... प्लीज... प्लीज...’’

‘‘हळूच... हात लाव फक्त. दूध मीच देते. अगं त्याला बरं नाहीये नं... त्याचे आईबाबा झाडाच्या फांदीखाली आले गं. त्यामुळं हा एकटाच तिथं पडला होता. अर्णवदादा त्याला घरी घेऊन आला. त्याची ओळख झाली आपल्याशी की मग दूध दे. मी मोठी आहे नं... आत्तापुरतं मी देते...’’

चारूला पटलं. ती त्याच्याकडं पाहातच राहिली.

दुसऱ्या दिवशीपासून सगळं आवरलं की अमृता-अर्णवकडे जाण्याचा परिपाठच झाला. आजीही मोकळी झाली. ‘अगं खा गं, खा गं!’ म्हणत आता चारूच्या मागे मागे फिरावं लागायचं नाही.

कुठल्यातरी पुस्तकातला सुधाकर नावाचा मुलगा अर्णवदाला आवडला होता, म्हणून मग खारूदादाचं नाव सुधाकर ठेवलं. कस्सलं नावऽऽऽ म्हणून चारूनं नाक मुरडलं, पण मग तिनं त्याला सुध्या म्हणायला सुरुवात केली.

सुध्या अगदी गरीब होता दिसायला. घरातलं काहीतरी चुकून फुटलं, सांडलं की संध्याकाळी बाबा ऑफिसातून यायच्या वेळी चारू जसा चेहरा करायची त्याला ‘गरीब’ म्हणतात असं तिला माहिती झालं होतं. आईनं बाबाकडं तक्रार करायच्या आधी बाबानं आपला चेहरा बघावा, आणि मग तक्रारीकडं त्याचं लक्ष जाऊ नये याची तयारी चारूनं केलेली असायची. सुध्याचा दिसणारा गरीब चेहरा खरोखरचा नेहमीसाठी तसाच आहे की आपला असतो तसा आहे हे काही लगेच कळणार नव्हतं.

सुध्याच्या सगळ्या खोड्या हळूहळू चारूच्या लक्षात यायला लागल्या. आजीच्या पण! आज्जी म्हणायची, ‘‘सुधाकर माणसाळलाय आता!’’

फळांच्या बुट्टीतून बाहेर येऊन तो मान हलवत सगळीकडं बघायचा. मग उतरला टेबलवरून. मग बेडवर चढायला लागला. मग इकडंतिकडं

खेळायला लागला. रूममध्येच. नुसतं हात लावताना भीती वाटायची नाही पण मांडीवर घ्यायला भीती वाटायची. एकदिवशी तो पायाशी येऊन चाटायला लागला आणि थोडं थोडं चावतसुद्धा होता. चारूनं पाय आपटले, पण तो पटकन पायावरून पाठीमागून मानेपाशी आला. मानेपाशी आल्यावर त्यानं चाटलं तेव्हा तिला कसंतरीच झालं. ती नाचायला लागली तेव्हा अर्णवदा म्हणाला, ''अगं तो तुझ्याशी दोस्ती करतोय. तू त्याला घाबरतीस तसं तोपण तुला घाबरतो. शांत बस म्हणजे तो ऐकेल तुझं. दोघं एकमेकांचा गोंधळ करू नका.'' मग तेव्हापासून भीतीबिती वाटायची बंद झाली.

त्याला सारखं कुठंतरी चढायचं असायचं. दाराची बेल वाजली की तो झरझर पडद्यावर चढायचा. पण तिथंच बसायचा नाही. एकदा दादाच्या ऑफिसातले कुणीतरी साहेब आले होते. मी सुध्याशी खेळत होते. बेल वाजल्यावर सुध्या पडद्यावर चढला. ते येऊन कोचावर बसले. अमृताते पाणी आणायला गेली. इतक्यात सुध्या पटकन खाली आला की काय कळलंच नाही. हॉलमध्ये येऊन तो साहेबांच्या पायावरून एकदम डोक्यावर चढला. अचानक अंगावर काय आलं म्हणून ते घाबरले. ओरडायला लागले. मानेजवळ आलेल्या सुध्याला त्यांनी धरलं आणि पटकन फेकलं.



गोंधळच झाला सगळा. सुध्या एकदम असं करेल असं वाटलंच नव्हतं कारण तोवर तो बेडरूममध्येच असायचा. पण अंगावर चढायचं ही त्याची सवयच होती.

सकाळी उठलं की दूध पिऊन चारू तडक अमृतातैचं घर गाठायची. आई म्हणायची, 'आता हिनं बॅग घेऊन तिकडंच राहाणं बरं!' आज्जी म्हणायची, 'काय तुझं गाठोडं पुरलंय गं तिकडं?' आणि बाबा, तो म्हणायचा,' ती रमलीय ना, मग जौदे की तिला.'

सुध्या उठला की पहिल्यांदा खिडकीत यायचा आणि ऊन खात बसायचा. आज्जी म्हणायची, ''माणसं घेतायत इंजिक्शनं, हाडं नाजूक म्हणून आणि इकडं हे सायेब ऊन खाऊन बळकट होताहेत!'' ऊन यायचं तेव्हा खरं तर सुध्या नुसताच शांत बसायचा. त्याची शेपटी नेहमीपेक्षा मोठी व्हायची. फुलायची. पण तोंड बंद असायचं. मग तो ऊन खाताना आज्जीला कुठनं दिसतं असा प्रश्न चारूला पडायचा.

सुध्याच्या बड्डेला तिनं त्याचं आणि तिचं चित्र काढून ग्रीटिंग बनवलं. ताईदादानं घरी झुरमुळ्या लावल्या. फुगे लावले. फ्लॉवरपॉटमध्ये फुलं लावली. आजीनं अडकित्त्यानं बदाम कातरून दिले ते त्याच्यासाठी सक्काळसक्काळी खिडकीत ठेवले. सगळी तयारी झाली. सुध्या उठला आणि नेहमीप्रमाणं खिडकीत आला. अमृताताईनं त्याचा चहा बशीत ओतून ठेवला होता. मग मीपण कातरलेले बदाम घेऊन आले. त्याच्यापुढं ठेवले. पण यानं आधी चहा संपवला आणि मग बदामाकडं आला. मी म्हटलं रागानं की, 'तुझ्यासाठी लवकर उठून आंघोळ करून आलेय मी तर तू नुसता गरीब चेहऱ्यानं बघत बसतोस?' साहेबांनी मग निवांत ऊन खाल्लं. अर्णवदाला म्हटलं की बघ, बघ या सुध्याला काहीपण नै आणि आपण एवढा वाढदिवस करतोय! तो हसून म्हणाला, 'वेडाबाई, तो काय माणूस आहे का नाचायला, माझा बड्डे माझा बड्डे म्हणून! आपण त्याचा वाढदिवस करतोय आपल्यासाठी, त्याला वाढदिवसबिढदिवस म्हैतपण नैये!' इतक्यात अमृतातै केक घेऊन आली तर याला वासावरून लगेच कळलं... सावकाश शिट्टी घातल्यासारखा आवाज करून लाडीगोडी लावायला लागला. आज्जी आली होती, ती म्हणाली, ''काय रे अर्णव, माणूस नाही नं हा? मग वास लागल्यावर माणसांना गोडीत आणायचं कसं कळतं रे

याला? प्राण्यांना बुद्धी फार!'' संध्याकाळी केक कापेपर्यंत सुध्याला थांबवणं अमृतातैला जमेना. तिनं केक मोडलाच. मग साधी पेस्ट्री आणून कापली संध्याकाळी. सगळ्यांनी टाळ्या वाजवल्यावर लाडक्या अर्णवदाच्या खांद्यावरून चटकन मानेपाशी लपेटून बसला. सगळे खायला बसल्यावर नेहमीप्रमाणे त्याचीपण डिश ठेवली होती. डाळिंब, दोडका, बाकरवडी हे सगळं आवडतं त्याचं. पण हे साहेब नेहमीप्रमाणं एका जागी न बसता गडबडगुंडा करत होते. गेले की फुग्याजवळ. नेहमीच्या स्टाईलमध्ये मारल्या नख्या. फुगा फुटला जोरात, मग जे धुम्म पळाले कपाटाखाली की आलेच नाहीत अर्धा तास. ज्यांचा वाढदिवस तेच पार्टीत नैत असं झालं.

चारूची शाळाबिळा सुरू झाली तेव्हा आवडत्या प्राण्याचं वर्णन करायचं होतं शाळेत. आज्जी म्हणाली, 'खारीला आमच्या कोकणात चानी म्हणतात. कवितापण होत्या अभ्यासाला. आताच्या मुलांना चानीची कविताच नाही.' मग आजीनी आणि तिनी मिळून एक कविता रचली. शाबासकी मिळवली.

चानी आमची मानी – तिचं नाव सुध्या

इकडून तिकडून फिरत फिरत – तो करतो खोड्या

सुध्या जसा प्रेमळ तसा आहे लबाड

बरोबर कळतं त्याला – कोण करतं आपले लाड

मोठी शेपटी झुबकेदार – मधाच्या थेंबाचे डोळे

लहानपणी प्यायचा दूध – बुडवून कापसाचे गोळे


डॉक्टरकडे जाताना सुध्या खूप दंगा करतो


आज्जी म्हणते अशावेळी सुध्या बरोबर चारूसारखा वागतो.

खरंचंय, 'सुध्याला डॉक्टरकडं नेणं हा व्यापच!' असं अमृतातै म्हणते. त्याच्या दातांसाठी एकदा नेलं होतं, एकदा इंजेक्शन द्यायला आणि त्याचे केस गळायला लागले तेव्हाही. त्यासाठी दिलेलं मलम त्याला अजिबात आवडायचं नाही... पण ते लावल्यामुळं केस गळणं कमी झालं. कमी केसांचा सुध्या वाईट दिसायचा. सर्दीपण खूपदा व्हायची त्याला. इतकं नाजूक शिंकायचा की बासच. एकदा त्याचं पोटपण बिघडलं होतं.

त्यावेळी त्यानं अगदी वेगळाच आवाज काढला. बरं नसताना तो असे कुठलेतरी वेगळेच आवाज काढून सांगायचा. साबुदाण्यासारखी गोल गोल मण्यांची शी तो करायचा. ज्या दिवशी काळे साबुदाणे जास्त त्याच्या आदल्या दिवशी खाल्लेला पदार्थ त्याला पुन्हा द्यायचा नाही असं ताईदादा ठरवायचे. चारूच्या आग्रहामुळं आज्जीनं एकदा हातशिलाई करून सुध्यासाठी कोट शिवला, घालताना भयंकर चिडला तो... झरझर अंगावर चढून नाकाला चावला, कानाला चावला, बोटांना चावला... अगदी छोटुसं, पण त्याला राग आलाय खूप हे कळत होतं.

ठरवलेल्या जागी तो कधी झोपायचाच नाही. कोचाच्या हात ठेवायच्या जागी किंवा अमृतातैच्या टीशर्टची पोटाची जागा किंवा दुमडून पोटाशी घेतलेल्या हातावर तो छान झोपायचा. देव्हाऱ्यातले देव तर तो कितीवेळा पसरून ठेवायचा... आणि एकदा देवाखाली ठेवलेलं मऊ लाल कापड हातात धरून झोपला होता. एकदा अमृतातैची पर्स उघडी राहिली तर नुसता दंगा घातला त्यानं पर्समध्ये. लिपस्टिक दातानं टोकरून टोकरून बाद करून टाकलं, टिकल्यांची पाकिटं फाटली... पण अमृतातै 'काय रे सुध्या' असं फक्त म्हणाली, ते पण लाडानं... हेच जर मी केलं असतं तर? – चारूला वाटलंच. एकदा अर्णवदाचा लॅपटॉपचा चार्जर त्यानं पार कुरतडून टाकला; तरी सुध्यासाहेब आरामातच!





पाहुणे आल्यावर तो अचानक  येऊ नये म्हणून युक्ती सापडली होती, पेपरचा किंवा प्लॅस्टिकच्या पिशवीचा आवाज केला की तो घाबरायचा. हॉलमध्ये यायचा नाही. समोरच्या काकूंच्या डॉगीशी त्याचं जमायचं. तो त्याच्या केसात शिरून मजा करायचा... पण दार उघडं ठेवलं की तो पसार होऊ  नये आणि मग उगीच कुणाच्या गाडीखाली येऊ  नये म्हणून दार पटकन बंद करायला लागायचं. एकदोनदा खिडकीतून ऊन घेता घेता त्यानं वाकून पाहिलं असणार, पडला होता. रक्त आलं, आम्ही सगळे खूप घाबरलो होतो. सुध्यापण घाबरला होता... मात्र दोन तासानं नॉर्मल झाल्यावर त्यानं पुन्हा दंगा सुरू केला.

सगळा वेळ फक्त सुध्या... सुध्या... सुध्या! अमृतातै म्हणायची, 'हे साहेब आपल्या घरात नाहीत; आपण त्यांच्या घरात राहातोय असं समजून नाचवतात नुसतं. सारखं लक्ष द्या यांच्याकडं! त्याशिवाय काही कामच नाही कुणाला!'

सुध्याला अभ्यास दाखवायचा, त्याच्या शेजारी चित्रं काढत बसायचं, त्याच्याबरोबर जेवायचं, पुढच्या दोन पायात बिस्किट धरून ते कुरूकुरू खाताना त्याला बघायचं– चारूचं सगळं असं झालं होतं.

सुध्या नंतर नंतर फार दंगा करेना झाला होता. पडद्यावरपण त्याला चढता येईना. त्याची लाडकी बडीशेप दिली तरी खाईना. भिजवलेल्या


डाळी, दोडका, बिस्कीटं.. त्याला काहीच आवडेना. त्यामुळं तो अशक्त होत होता.

टीव्हीवर डॉ. अब्दुल कलाम गेल्याची बातमी चालू होती तेव्हा अचानक चारूला प्रश्न पडला की सुध्यापण मरणारे की काय? असं झालं तर सुध्याशिवाय कसं करमणार?

जांभई दिली की आपल्या डोळ्याच्या कडेला जे पाणी यायचं तेही खरं तर तो लाडानं पिऊन टाकायचा... आता 'सुध्या, खा की रे' म्हणून चारूनं रडं सुरू केलं तरी तो हलत नव्हता की घाबरून पळत नव्हता...

सुध्याचं पाच-सहा दिवस असंच चाललं होतं. डॉक्टर म्हणाले, 'त्याची ताकद कमी झालीय, म्हातारा झालाय तो.'

शाळेतून आल्या आल्या आजीनं दिलेले दडपे पोहे घेऊन चारू सुध्याकडे आली. त्याच्या शेजारच्या बशीत थोडे पोहे ठेवले. अमृतातै आणि अर्णवदाचा काही खायचाप्यायचा मूड नव्हता. सारखा मूड डाऊन करायचा चारूला कंटाळाच आला, पटकन म्हणाली ती, ''अनयच्या घरी असलेला पोपट म्हातारा झाला म्हणून मरून गेला. मग त्यांनी त्या पोपटाला बागेत पुरलं आणि त्याचं आवडतं पेरूचं झाड लावलं... आपला सुध्या गेला की कुठलं झाड लावायचं? डाळिंबाचं की क्रीमच्या बिस्किटाचं की डाळींचं?''



# गोष्टीची गोष्ट

सोहा आणि अनयला वाटलं होतं तितकं पटकन हे प्रकरण काही पुढे सरकेना!

काय करायचं? काय करायचं? काय करायचं? सुपर क्वेश्चन!

नवी शाळा, नवा वर्ग, प्रत्येक विषय शिकवायला नवे शिक्षक, नव्या नव्या जागी सहली... सोहा, अनय, दिपी, मनस्वी, कुणाल, निहाल यांचं 'छकडं' एकदम खूश होतं! पाचवीत गेल्यावर घरातला त्यांचा मानही खूप वाढला होता. पण आता तो मान टिकवायचा तर 'हे' काम नीट जमायला हवं ...

''शिंच्यान, नोबिता–डोरेमॉन, मिस्टर बिन्समधली एखादी स्टोरी लिहूया...'' – सोहा


''चालतंय की! प्रत्येकानं एकेक लिहायची. रोज रोज कितीतरी गोष्टी दाखवतात त्याच्यात!'' – कुणाल

''आणि छोटा भीम, बिरबलसुद्धा आहे... होय ना रे अनय?'' – निहाल

''अरे काल गलिव्हर्स ट्रॅव्हल लागलावता... कस्सला मस्तय ना?'' – दिपी

''अं... तो तर काल लागलावता. तो मी बघितलाय आधीच, त्याच्यापेक्षा 'पोन्यो' बघ. जपानी आहे. सोसुके त्याला आवडलेल्या एका छोट्या रंगीत माशाचं नाव पोन्यो ठेवतो आणि मग पोन्यो जादूनं खरोखरची मुलगी होते. तिचे बाबा समुद्रातले जादूगार असतात. काईपण करू शकत असतात... भारी आहे एकदम!'' – मनस्वी

''असं असेल तर लांब सोनेरी जादूच्या केसांच्या राजकन्येची गोष्ट काय वाईट? 'टँगल्ड'मध्ये पाह्यलंय मी. ७० फूट लांब केस! सॉलिड नं?'' – सोहा



''बास. बास आता चर्चा. मग काय आपण हॅरी पॉटर, स्पिरीट, ब्लॅक स्टॅलिअन कुणाच्यापण गोष्टी सांगू शकतो... मॅम म्हणाल्यात की माहिती असणारी गोष्ट नाही लिहायची... त्या गोष्टी आधीच कुणीतरी लिहिल्यात. तुम्ही जे बघता, जे दिसतं त्याची गोष्ट लिहा म्हणाल्या ना मॅम? मग?'' – अनय.

नवी गोष्ट कशी तयार करायची यावरनं मुलांच्यात रंगलेली चर्चा पार्किंग स्लॉटमध्ये स्कूटी लावताना सुभाषच्या कानी पडली. संध्याकाळची वाचनालयाची चक्कर आटोपून सुभाष नुकताच परतत होता. भाजीची पिशवी, इस्त्रीच्या कपड्यांचा गठ्ठा हातात सावरून निघताना हा कल्ला सहजच कानावर पडला. मिशीतल्या मिशीत सुभाष हसला. त्याचे काळे–पांढरे आधीच फुललेले केस स्कूटीच्या रपेटीमुळं मस्त सिंहाच्या आयाळीसारखे दिसत होते. सुभाष जरी मिशीत हसला तरी त्याचे चष्म्यातून लुकलुकणारे डोळे, केस, हात–पाय, कान, कपाळ, जाडसर काळ्यापांढऱ्या भुवया सगळ्यांतूनच तो हसतोय असं वाटतं. म्हणजे हे त्याच्या दोस्तांचं म्हणणं आहे. सोहा, अनय, दिपी, मनस्वी, कुणाल, निहाल त्याचे जिवलग यार! कधी कधी मूडमध्ये सुभाषनं शिकवल्याप्रमाणं ठेका धरून त्याच्याबरोबर 'यारी है इमान मेरा यार मेरी जिन्दगी' या गाण्यावर सुभाषसह सगळी जाम नाचतात. पाय दुखेपर्यंत! सुभाष त्यांच्या बाबांएवढा आहे की आजोबांएवढा यानं या छकड्याला म्हणजे सहा जणांच्या टोळक्याला काही म्हणता काही फरक पडत नाही. तो त्यांचा दोस्त आहे एवढंच कळतं त्यांना... आणि दोस्ताला कोणी अहो–जाहो करतं का? म्हणूनच सोहा, अनय, दिपी, मनस्वी, कुणाल, निहाल सगळीजणं सुभाषला त्याच्या नावानंच हाक मारतात... ए सुभाष म्हणून! आता सगळ्यांना सुभाष आणि छकड्याचं गुळपीठ माहिती झालंय... यामुळं सुभाषबाबतीत कुणी काही समजवायला, उपदेश करायला, सल्ला द्यायला जात नाही. सोसायटीतली इतर माणसं सुभाषला सर, साहेब, काका, मामा वगैरे म्हणतात, पण त्याचे दोस्त त्याला सुभाषच म्हणतात... कशाचातरी भयंकर आनंद झाला आणि आपसात पार्टीबिर्टी ठरली की सुब्बुसुद्धा म्हणतात!

सुभाषनं मुलांचं चर्चेचं गुऱ्हाळ चालू दिलं आणि तो सरळ घरी गेला. त्याला माहिती होतं की घरी पोहोचून चहाचा एक घोट जिभेवर रेंगाळायला लागेल न लागेल तोवर 'छकडं' त्याच्याकडे मोर्चा वळवणार! झालंही तसंच...

''सुभाष, ए सुभाष... काय करतोयस? जाम टेन्शनमध्ये आलोय बघ आम्ही... तुझी मदत हव्ये...''

छकड्यातला प्रत्येक 'आयटम' जरी स्वतंत्र विचारांचा स्वतंत्र माणूस असला तरी सगळ्यांनी मुद्दा सांगून गोंधळ करण्यापेक्षा सगळ्यांचं मिळून एकानं आपलं म्हणणं सांगायचं, तर समोरच्याला कळतं हे 'छकड्या'ला कळत होतं... म्हणूनच अनय सगळ्यांच्या वतीनं बोलला. सुभाषनं सगळ्यांकडं सावकाश पाहात सेम अर्धवर्तुळ काढल्यासारख्या भुवया उडवल्या... डोळे मिचकावले... आणि आरामखुर्चीत चहाच्या कपासह पोज घेतली. गंभीरपणानं विचार करताना सुभाष असंच काय काय करतो हे छकड्याला एव्हाना माहिती झालंवतं. त्याच्या असं करण्यानं ती थोडी निर्धास्तही झाली; कारण आता चहाचा कप संपवला की सुभाष सगळं नीट ऐकेल आणि काय ते ठरवता येईल हे त्यांना कळलंवतं. आता आपली अडचण कुणाजवळ तरी मांडता येणारे यानं हायसं वाटल्यानं लगेच सोहा सुभाषच्या फ्रीजकडं वळली. कोकमाचं सरबत काढलं. कुणालनं पाणी, सरबतासाठी पातेलं, साखर, मीठ, ढवळायला चमचा अशी तयारी केली. बाकीच्यांनी आपापल्या आवडत्या रंगाचे ग्लास काढले आणि गंभीर प्रश्नावर चर्चा करण्यासाठी वातावरण तयार केलं. असं वातावरण तयार करून कामं मार्गी लावण्याची तशी सगळ्यांनाच सवय होती. ताईची लिपस्टिक वापरायची असेल तर तिची कोणती कामं करायची, आईकडून अवेळी दडपे पोहे हवे असतील तर घरात पसारा कसा करायचा नाही, नवीन गेम्स पदरी पाडून घ्यायचे असले तर बाबांच्या आवडत्या कविता कशा तोंडपाठ म्हणून दाखवायच्या, हातातून आईबाबांच्या कामाचं काही फाटलं, फुटलं तर नेमकं कसं वागायचं... सगळ्याचे अंदाज छकड्याला होते. मनस्वीची आज्जी तर नेहमी या टोळक्याकडं बघून म्हणायची, ''हिमनगाची टोकं आहेत टोकं! एक नवमांशच पाण्याच्या वर! अंदाज देत नाहीत... काय नवीन शिजतंय मेंदवांमध्ये तो एक परमेश्वरच जाणे!''

‘‘बोला मंडळी... आकाश यावेळी कुठं कोसळलंय?’’ चहाचा रिकामा कप टीपॉयवर ठेवत सुभाषनं विचारलं.

‘‘आपली तर सटकलीय...’’ निहाल जोरदारपणे म्हणाला.

प्रत्येक दहा वाक्यानंतर कुठल्या ना कुठल्या नव्यानं पाहिलेल्या सिनेमाचा डायलॉग मारल्यावर निहालला जोश येतो.

‘‘शाळेतली नि घरातली एकेक टेन्शन काय कमी आहेत म्हणून आता हे एक ॲडिशन!’’ गंभीर चेहरा करून दिपी म्हणाली.

‘‘अरे... हो... हो... पण अजून कळत नाहीये मला... कितीवेळ प्रस्तावनाच करताय. जगबुडी होण्याची परिस्थिती कुठल्या कारणामुळं आली ते बोला की मंडळी!’’ – सुभाष

‘‘मी सांगतो. अरे मॅमनी सांगितलीये एक गोष्ट लिहायला. ती गोष्ट कुठून ऐकलेली नको. वाचलेली नको. सिरीयल किंवा फिल्मची स्टोरी नको. मग अगदी नवी गोष्ट कशी काय बरं लिहिणार? आम्हाला कुणालाच काही सुचत नाहीये.’’ – अनय

‘‘स्कॉलरशिपला मागच्या वर्षी आम्ही गोष्ट लिहिण्याची प्रॅक्टिस केलीवती रे, पण त्या गोष्टीचं वेगळं होतं. ती मुद्द्यावरून गोष्ट होती. कधी काय होतं ते त्यात दिलेलंच असायचं. फक्त त्याची पूर्ण वाक्यं करायची आणि घडून गेल्यासारखी म्हणजे भूतकाळात लिहायची असं शिकवलं होतं. गोष्ट लिहिताना त्यात मधेमधे वाक्प्रचार किंवा म्हणी वापरायच्या, शेवटी तात्पर्य लिहायचं, इसापनीतीमध्ये किंवा पंचतंत्रातल्या गोष्टीत असतं तसलं... नंतर गोष्टीचं शीर्षक द्यायचं. ते काय सोप्पंय. झालं! एवढं सगळं नीट केलं की दहा पैकी साडेआठ मार्क तर मिळायलाच पाहिजेत सोड! पण नवीन गोष्ट कशी करायची ते काय माहिती नाही...’’ – सोहा

‘‘बरं बरं... ठीकाय. गोष्टीचा आपण विचार करू, पण नंतर. आधी मी आज वाचलेली एक कविता शेअर करतो तुमच्याशी. कविता आहे रवींद्रनाथ टागोरांची. मूळ बंगाली भाषेतली, पण आपल्याकडचे डॉ. राम म्हैसाळकर म्हणून कवी आहेत त्यांनी तिचं मराठी भाषांतर केलं... ती वाचून दाखवतो... ऐका...

देवळासमोर जत्रेची गर्दी जमली होती!
तोबा गर्दी. दिवसभर पावसाची रिपरिप चालूच होती!
आता आता संध्याकाळी पाऊस थोडा थांबला होता
गर्दीला अगदी उधाण आलं होतं
नुसता निर्भेळ आनंद त्या गर्दीत मिसळला होता
प्रसन्नता विराजत होती
पण त्याहीपेक्षा जास्त आनंद झाला होता त्या छोट्या मुलीला
कारण एका पैशाची पानाची पिपाणी
तिनं जत्रेत घेतली होती
त्या आनंदाच्या भरात ती सारखी पिपाणी वाजवत होती
त्याचा कर्कश आवाज आनंदानं दुथडी भरून
जत्रेच्या कल्लोळावर ताण करत होता!
जत्रेतली गर्दी वाढतच होती... त्यांची बडबड
आरडाओरडा... सगळाच कल्ला! रस्त्यानं चिखल...
समोरच्या शेतात पाणी साचलं होतं
आणि शेजारची नदी पुराचं लालगढूळ पाणी
आरडाओरड करत वाहून नेत होती!
कारण त्या पाण्यालादेखील जत्रेत भाग घ्यायचा होता
म्हणून ते ओरडत आपलं दु:ख व्यक्त करीत होतं! –पण
ह्या सर्वांपेक्षा त्या छोट्या मुलाचं दु:ख फार मोठं होतं!
रंगीत चक्री घ्यायला त्या मुलाकडं पैसा नव्हता...
आपल्या आसुसल्या नजरेनं तो वळून वळून, पुन्हा पुन्हा पहात होता
त्यापुढं ही जत्रेतली गर्दी किती केविलवाणी दिसत होती!!

''कशी वाटली कविता? आता बोला... मनात जे जे येतंय ते बोला... त्या मुलाविषयी, जत्रेविषयी, पावसाविषयी, नदीविषयी, चिखलाविषयी... आणि ही कविता वाचून दाखवत असताना दुसरं काही तुमचं तुमचं, या कवितेत नसलेलंसुद्धा आठवलं असेल तर तेसुद्धा बोला...

मीपण सांगीन मला काय काय झालं कविता वाचून ते...'' सुभाष म्हणाला.

''सुभाष, तू सांग ना आधी... म्हणजे कसं सांगायचं ते कळेल... चुकायला नको रे सांगताना...'' मनस्वी तिचे टपोरे डोळे आणखी मोठे मोठे करत, तोंडाचा चंबू करून, मान हलवत हलवत म्हणाली.

''अरे त्यात चुकायचं काय? आपल्याला वाटतं तसं सांगायचं... चूक-बरोबर करायला काय मी शाळेतली परीक्षा घेतोय का? आणि मित्रामित्रात काय तयारी करून बोलतात; वक्तृत्व स्पर्धेत बोलल्यासारखं? आपण आपलं आपलं बोलायचं... स्वत:ला काय वाटतं ते! पाहिजे तर थोडा वेळ विचार करा... मग बोला... फक्त एकानं सांगितलेलं दुसऱ्यांनी मनात असलं तरी रिपीट नका करू वेगळं बोला...''

''सुभाष... मलासुद्धा दु:ख झालं रे... त्या मुलाला ते रंगीत चक्र घेता आलं नाही म्हणून. मी आईबाबांकडे वाढदिवसाला व्हिडीओगेम मागितला होता... मला जो पाहिजे होता तो दुकानात नव्हता म्हणून मला त्यानंतर चार दिवसांनी आईबाबांनी दिला. तरीपण मी चिडले होते... वाढदिवसाच्या दिवशीच का नाही मिळाला... त्यांनी आधी का ऑर्डर प्लेस केली नाही म्हणून! कवितेतल्या त्या मुलाचे आईबाबा नाही आले का जत्रेत? ते त्याला पैसे का देत नसतील? गरीब असल्यामुळं पैसे नसतील का त्यांच्याकडे? आईबाबा असतील ना त्याला? ते असतातच प्रत्येकाला... मग? मला माझ्या खेळण्यांचा कंटाळा आला की आई ती जमा करून छायामावशींना देते, त्यांच्या मुलीसाठी. माझे जुने कपडे, पुस्तकंसुद्धा देते. सुट्टीच्या दिवशी कधीतरी त्या त्यांच्या मुलीला घेऊन येतात घरकाम करायला तेव्हा तिनं माझे कपडे घातलेले असतात. मग मला कसंतरी होतं... म्हणजे मला वाटतं की ती मीच आहे का... मला नाही तसं व्हायचं...'' – सोहा मनातलं मनापासून सांगत होती.

''मलापण त्या मुलाचं वाईट वाटंय...'' अनय बोलतच होता इतक्यात सोहानं त्याला गडबडीनं थांबवलं... ''एकच गोष्ट रिपीट करायची नाही हे ठरलंय ना आपलं अनय... वेगळं काहीतरी सांग!''

''हो... विसरलोच!'' अनय खजील होऊन चुकचुकला... आणि सांगू लागला, ''मागच्या वर्षी मेच्या सुट्टीत आम्ही कोकण ट्रिपला गेलो

होतो ना तेव्हा वळवाचा पाऊस आला. जाम राडा केलान् पावसानं. पाऊस येण्याआधी अंधार होत गेला, ढग गडगडायला लागले... वारा सुटला... घुईंघुईं ऽऽ घुईंघुईं ऽऽ घुईंघुईंघुईंघुईं... शप्पत काय आवाज होता! खिडकीतनं पाह्यलं तर झाडं केवढी वाकली होती बागेतली... आणि थोड्या वेळात पाऊस टपाक्टपाक् पडायला सुरुवात झाली. एकदम मोठ्ठाल्ले थेंब पडले... मग जोरात सुरू झाला. मस्त वास सुटला. गारा वेचायला आम्ही धावलो. भरपूर वेळ खेळलो पावसात. इतकं खेळल्यावर भयंकर भूक लागली. विजा जोरात चमकायला लागल्यावर मात्र आम्हाला ओरडून आत बोलावलं मोठ्या माणसांनी. वीज पडते इकडच्या भागात म्हणाले... ढग गडगडताना येणारा आवाज ऐकून आजी म्हणाली, 'पोरांनो, म्हातारी दळायला बसली बघा!' कस्सलं भारीय ना! म्हणजे बाबा म्हणतात, 'ढगावर ढग आपटून वीज चमकते' आणि आमच्या आज्जीची ढगातली म्हातारी पीठ दळते. आणि एक, भिजून भिजून रात्री टाचा नि तळहात मात्र दुखले.''



''पावसातलीच एक गम्मत मला आठवतेय. रिपीट नाही करत. भिजण्याची गंमत नाहीये. वेगळ्ळीये! आमच्या घराजवळच्या झाडावर चिमणीनं घरटं केलं होतं. ती घरट्यासाठी गवत, दोरे आणि काय काय कसं जमवते ते आजोबांनी मला सांगितलं होतं म्हणून आमच्या इथल्या झाडावर चिमणी घरटं करायला लागल्यावर मी नीट लक्ष देत होतो. त्या घरट्यात चिमणीला दोन पिल्लंपण झाली. चिमणी त्यांना खाऊ भरवायची तेव्हा ती पिल्लं आ करायची आणि त्यावेळी माझंपण तोंड उघडं व्हायचं, मीच खात असल्यासारखं! मला ते बघायला फार आवडायचं. एक दिवस पावसात कस्सला आवाज म्हणून मी झाडाकडं पळाले तर चिमणीचं एक पिलू घरट्यातून खाली पडलंवतं. खूप ओरडत होतं. चिमणी नव्हती वाट्टं घरी. मी उचलायला लागले तर शांतामावशी म्हणाल्या, ''माणसाचा वास लागल्यावर चिमणी काय पिलाला जित्तं ठेवणार नाही. आता तुझं पिल्लू काय जगत नाही.'' मी आजोबांना हाक मारली. त्यांच्या मदतीनं पिलाला हात न लावता सावकाश वहीवर घेतलं आणि आजोबांनी मग त्याला घरट्यात ठेवलं.'' मनस्वीचा चेहरा त्या पिलाच्या आठवणीनं एकदम खुलला.

जत्रेबद्दल कुणी बोललं नाही म्हणून कुणाल एकदम खूश झाला. त्या आठवणीनं जणू जत्रेत पोहोचल्यासारखाच तो बोलायला लागला, ''आम्ही एकदा जत्रेला गेलोवतो. ३२ शिराळ्याला. नागपंचमीला. सगळ्यांच्या घरी तिथं एका मातीच्या गाडग्यातनं नाग आणत होते. गाडग्यावर आणि एक छोटं गाडगं आणि त्यावर रंगीत कापड असं लावून ते नागवाले दोरखंडानं घट्ट गाठ मारत होते. मग दोन्ही गाडगी एकमेकांवर पक्की बसायची. इतक्या पॅकिंगमध्ये आत नाग असायचा. नाग बाहेर काढला की फुस्स ऽऽ फुस्स ऽऽ असा आवाज करायचा आणि गाडग्यात खडे घालून ते वाजवत नागवाले त्याला फणा काढून उंच उंच डोलायला लावायचे. दुपारी नागांची मिरवणूक बघायलापण गेलो आम्ही. मला भीतीच वाटली कारण तिथं ट्रकवर आणि ट्रॅक्टर ट्रॉलीवर दोन-चार नाग सोडले होते. भरपूरच गर्दी होती. पाऊस पडत होता. समजा, नाग गर्दीत पळाले तर काय होईल असं वाटलं.''

''मला तर वाटलं की कवितेतल्या जत्रेत गर्दी होती ती आपल्या भाजीमार्केटमध्ये किंवा लोकलमध्ये असते तितकी भयंकर असते का? मला



गर्दीचा जाम कंटाळा येतो. गर्दीतला सिग्रेटचा वास मुळ्ळीच आवडत नाही. त्या वासानं मला कसंतरीच होतं! एकदा तर असंच वासानं मला कसंतरी झालं आणि मग मी आईच्या डोक्यातला मोगऱ्याचा गजरा हुंगला... मोगऱ्याचा वाससुद्धा मला तसाच सिग्रेटसारखा यायला लागला. आई म्हटली, तुझ्या नाकात भरलेला वास आता कसा काढू?'' निहाल त्या वासाच्या आठवणीनंसुद्धा याक याक करत बोलायचा थांबला.

''मला काय वाटतं सांगू? ज्या मुलीला पिपाणी मिळाली होती तिची आणि चक्री न मिळालेल्या मुलाची समजा जर का जत्रेत भेट झाली असती तर काय झालं असतं? एकदा आम्ही कोल्हापूरला देवीच्या दर्शनाला गेलो होतो तेव्हा माझ्या मावशीची पर्स चोरट्यानं पळवली. पोलीसांना सांगून मग आई, मावशी, मी नि माझा मावसभाऊ महाद्वार रोडवर रपेट मारायला गेलो. मला तिथल्या दुकानातली टिफीनबॅग घ्यायचीच होती. आईनं माझ्यासाठी आणि पिनूसाठी दोघांसाठी आवडीची बॅग घेतली. मावशीची पर्स हरवूनसुद्धा पिनूला कशी बॅग मिळाली... तसंच रे सुभाष. मी असते ना जत्रेत तर त्या मुलाला चक्री दिली असती,'' दिपी डोळ्यावरचा चष्मा नीट करत गंभीरपणानं म्हणाली.

आता बोलायची पाळी सुभाषची; म्हणून छकडं त्याच्यावर डोळे रोखून पाहायला लागलं. आता सुभाषला बहुतेक बोलायला काहीच राहिलं नाही असं सगळ्यांना मनातून वाटत होतं... पण जर का तो बोललाच तर काय बोलेल याची उत्सुकताही जाणवत होती.

सुभाष मन लावून सगळ्यांचं सगळं ऐकत होता. आता तो एकटा बोलायचा राहिला होता. आळीपाळीनं प्रत्येकाकडं पाहात त्यानं बोलायला सुरुवात केली. त्याच्या चेहऱ्यावर आश्चर्य आणि आनंद अगदी वाहात होता. डोळे चमकवत तो म्हणाला, ''अर्रेऽऽऽऽ कमाल आहात तुम्ही लेको! गोष्ट कशी लिहायची, असं तुम्ही विचारल्यावर मला पटकन उत्तर देता येईना. तुमचं आणि माझंही टेन्शन हलकं करावं म्हणून हाताशी असलेली कविता वाचली. ही कविता मी रवींद्रनाथ टागोरांची म्हणून वाचली होती. त्यातलं वर्णन ऐकलंत ना? किती काय काय आहे त्यात! पाणी हसतं, बोलतं, रडतं, तक्रार करतं हे जर कुणी सांगायला लागलं तर आपण म्हणू की राव, डोक्याला शॉट लागल्यासारखं बोलू नका. – पण कवितेतल्या पाण्याला ते जत्रेत येऊ शकत नाही याचं दु:ख होत होतं हे आपल्याला पटलं. आपण त्यावर वाद नाही घातला. कविता नुसती ऐकून तुम्ही प्रत्येकानं इतक्या कमी वेळेत किती प्रकारे विचार केलात. कविता वाचण्याआधी मीसुद्धा इतका विचार केला नव्हता. एखादी गोष्ट आपण वाचतो, ऐकतो, पाहातो तेव्हा बऱ्याच वेळा आपलं काहीतरी आपल्याला आठवत असतं. आताच्या कवितेचंच पाहा ना... आपण कवितेतल्या जत्रेतपण होतो नि खरीखुरची नागपंचमीची जत्रा आपल्याला आठवली, जत्रेतल्या मुलाला चक्री मिळाली नाही तेव्हा पिनूच्या आईची पर्स हरवल्याचं आठवलं. गर्दीतला वास इथंच येत असल्यासारखं झालं, चिमणीचं घरटं, पावसात चिंब भिजण्याचा आणि वातावरणाचा अनुभव हे काय काय कवितेबरोबर आठवत गेलं. गंमत म्हणजे प्रत्येकाला एक एक गोष्ट सापडली की, स्वत:ची!

''येस्स्स्सस!!! मला कळलं... मला कळलं! सुब्बू, मी ना आता जत्रेतल्या नागाची गोष्ट लिहितो... म्हणजे अजून सगळं काही ठरलं नाही, पण तू म्हणालास ना की आपल्याला काहीतरी आठवत जातं... तसाच ट्राय मारून बघतो. म्हणजे एक नाग आहे. त्याचे खूप मित्र नाग आहेत...''

कुणालचं बोलणं आपल्या हीहीहीही–खीखीखीखीनं मधेच तोडत मनस्वी म्हणाली, ''काय पण जोक मारतो. नागाचे मित्र नाग नाही तर काय हरणं असणार? का हत्ती असणार? का त्याचं मिनी व्हर्जन गांडूळ असणार? म्हणे नागाचे मित्र नाग!''

''ए गप मने! नागाचे मित्र माणूसही असू शकतात. माझ्या शेजारचा डॉम्निकदादा आणि त्याची बहीण ज्युलिया सर्पमित्र आहेत. उगीच ज्ञान पाजळू नको!'' असं म्हणून कुणालनं मनस्वीचं बोलणं तोडत आपलं सांगणं चालू ठेवलं, ''तर तो एक नाग आणि त्याचे अनेक मित्र जे की नाग असतात त्यांना नागपंचमीसाठी पकडलेलं असतं माणसांनी आणि मग त्यांना गाडग्यांमध्ये बसवल्यावर त्रास होत असतो. मग सकाळी गवतावर दव पडतं तेव्हा त्यांना सोडलेलं असताना ते मिटींग घेतात आणि पळण्याचा प्लॅन ठरवतात अशी ती गोष्ट मी करणारे... ठरलंच!''

''वा मस्तच! मग पाहिजे तर डॉम्निकदादा नि ज्युलियाताईला तू त्यांच्या मदतीला पाठव. इंटरेस्टिंग होईल...'' – दिपी

''थँक्यू दिपी... आयडिया जम गई बॉस!'' – कुणाल

''कुणाल... आता मला पण सुचलं काहीतरी. म्हणजे पावनखिंड ट्रेकला आम्ही गेलो होतो ना तेव्हा पाऊस होता थोडा थोडा. आम्ही मजेत चाललो होतो. मधे एकदम आभाळ भरून आलं. काळंकाळं झालं आणि जोरकस पाऊस आला. सगळे जिथे जिथे आडोसा होता तिथे खळीत उभे राहिले आणि नंतर ट्रेक डिरेक्टर आमची मोजणी करायला लागला तर ३५ ऐवजी ३४ माणसंच मोजली जात होती. मग प्रत्येकजण आपल्याबरोबरच्या माणसांना आठवायला लागलं आणि कळलं की सोवनीकाकू दिसत नाहीत. मग त्यांना बघायला काही माणसं पुन्हा मागं गेली... सोवनीकाकूंना दिसत नाही. त्या अंध आहेत. पण त्यांनी खूप ट्रेक केलेत. तरीपण मग सोवनीकाकू कशा सापडल्या याची गोष्ट मी लिहीन...'' अनय म्हणाला.

बराच वेळ सुभाषचा हॉल उत्साहाच्या किंकाळ्यांनी, 'मी आधीऽऽऽ मी आधी'च्या आरोळ्यांनी दुमदुमत राहिला. कुणाल आणि अनयप्रमाणे सोहा, दिपी, मनस्वी आणि निहाल यांनाही त्यांची 'स्वत:ची',


‘नवी कोरी’ गोष्ट सापडली होती.

टोमॅटोची कोशिंबीर अजिबात न खाणाऱ्या दिपीला त्या दिवशी रात्री जेवताना वाटलं, ‘‘टोमॅटोची कोशिंबीर वाटलं होतं तितकी वाईट नाही लागत चवीला! काहीच कारण नसताना टोमॅटो न आवडणाऱ्या मुलीची गोष्ट लिहून बघूया का?’’

त्या रात्री गोष्ट सापडण्याच्या आनंदात मनस्वीला लवकर झोपच येत नव्हती... तिनं झोप न येणाऱ्या राजकन्येची गोष्ट रचायला मनातल्या मनात सुरुवातही केली होती.

सोहाला युनिट टेस्टमध्ये पैकीच्या पैकी मार्क मिळाल्यावरसुद्धा इतका भयंकर आनंद झाला नव्हता जितका गोष्टीचा विचार करून होत होता...

निहालला वाटत होतं... मनात आलेले विचार पेन आणि कागद आपले आपले लिहीत असते तर कित्ती बरं झालं असतं! इतकी मजा येतेय गोष्टीचा विचार करताना; पण सकाळी लवकर उठायचं असेल तर आत्ता झोपलं पाहिजे... पण जे मनात येतंय ते लिहून काढावं वाटतंय... झोपेत विसरलं तर! झोपेत सगळं विसरलेल्या मुलाची गोष्ट लिहू का मी?



# मन्यांशी मनमिळवणी

मला सुट्टीत अनुमावशीकडं जायला फार आवडायचं. अनुमावशीचं घर म्हणजे एक मोठा वाडा. मधे चौक. चौकात बंब. बंबाच्या कडेला एक छोटी विहिर. विहिरीला रहाट. चौकाच्या चारही बाजूनं कट्टा. प्रत्येक बाजूला मोठाले लाकडी खांब. त्याच्या मधून पळायला मला फार मज्जा वाटायची. चौकात एक प्राजक्ताचं झाड होतं, एक पेरूचं आणि एक शेवग्याचं. चौकातून दिसणाऱ्या लाकडी पट्ट्या लावलेल्या गॅलरीवर वेली चढलेल्या असायच्या. आणि चौकातल्या कट्ट्यांच्या आजूबाजूला खोल्याच खोल्या. भरपूर खोल्या. दिवसभर तिथं हुंदडायला मजा यायची. घराबाहेर जायचंच काम नाही इतकी घरात खेळायला-पळायला जागा. अडचण फक्त एकच होती. मी घरीदारी सगळ्यांची महालाडकी. अनुमावशीचीही मी लाडकी होतेच, पण अनुमावशी तिच्या पाच मांजरांचे जरा अतीच लाड करते असं मला वाटायचं. मांजरांमुळं आपलं महत्त्व कमी होतंय असंही वाटायचं.

''आपल्या घरी काही मांजर टिकत नाही बाई,'' असं आई म्हणायची तेव्हा मला आनंद व्हायचा.

''नक्कोच आपल्याकडं मांजर. मीच एकटी तुझी. मी तुझं सगळं ऐकते तसं मांजरं ऐकतात काय?'' मी आईला म्हणायचे.

लहानपणापासून माझं मांजरांशी तसं जुळलंच नव्हतं. अर्थात मी काही फार मोठी नव्हते. पुढच्या वर्षी पाचवीत जाण्याइतकीच मोठी. मी दुसरीत जाईपर्यंत माझी आजी होती. नंतर ती गेली. परत न येण्यासाठी. तोपर्यंत आमच्याकडे मांजर होती. तिचं नाव रूमी. मांजराचे सगळे 'गुण' लहान असूनही मला कळायचे. मी चिडायचे, पण आज्जी म्हणायची, ''मुकं जनावर ते! त्याला प्रेम दिलं की ते तुम्हाला प्रेम देतं. त्याची काही मागणी नसते. हट्ट नसतात. कशाला राग राग करतेस तिचा?''

अनुमावशीसुद्धा आज्जीसारखीच. सतत मांजरांना समजून घेणारी. त्यांना लाडकं बनवणारी.

इना, मीना, डीका, डाय, डॅमनिका अशी तिच्या मांजरींची नावं.

म्हणे मांजरांचं काही मागणं नसतं!

नसतं कसं? मागच्यावेळी मी आल्या आल्या अनुमावशीनं कॅडबरी हातात दिली तेव्हा पाचींपैकी एकीनं कस्सली झडप घालून पळवली. मी कोचावर बसलेले. माझं लक्ष होतं म्हणा मांजरीकडं, पण ती पोटातून गुरगुर आवाज काढत पुढचे पाय पोटात घेऊन बसली होती. मला काय कळणार की ती माझ्यावर उडी मारण्याकरता पोझिशन घेऊन बसलीय. तिच्या नखांनी ओरखडाही बसला होता तेव्हा. मी जोरात किंचाळले, पण माझी काळजी करण्याऐवजी 'डीकाला चॉकलेटची भारी आवड!' म्हणून तिचं कौतुक करण्यातच मावशी गुंगून गेली. माझं तिला काहीच पडलेलं नव्हतं.

दुसऱ्या दिवशी तिच्यावर राग काढायचा म्हणून मी तिला गोडीनं हातांवर घेतली आणि गॅलरीतून खाली टाकली. पण काय उपयोग... जोरात टाकूनही ती तिच्या चारी पायांवर अलगद उभी राहिली नि पळून गेली. तिला काहीच झालं नाही. माझे प्रयत्न वाया गेले.


या पाची जणी अस्सा हुकूम चालवतात घरावर; जणू काही घर त्यांचंच आहे नि मावशी आणि बाकीची मंडळी त्यांच्याकडं राहायला आलीत. तक्रार सांगावी तर गरीब चेहरा करून टकमक बघत राहातात. पायाला अंग घासत राहातात आणि मग त्यांचा दुष्टपणा कुणाच्या लक्षात येत नाही.


कसलाही वास बरोबर लागतो यांना. दूध कुठं ठेवलंय, ताजी मिठाई कुठल्या कपाटात आहे, गर्रम पोळी तव्यावरनं उतरली का? चकलीच्या पहिल्या घाण्यातली चकली देवापुढं गेली का? सगळं यांना लागलीच कळतं. त्यांचा हा डाव कळल्यापासून मी नाक आकसून घेत जास्तीजास्त वास घेण्याचा प्रयत्न करायला लागले. सारखी सूँऽऽ सूँ करायला लागले, तर घरी म्हणाले, ''सर्दी झालीय का शेंबडाबाईंना? औषध लावा वेळेवर नाहीतर दोन्ही पात्रांमधून नद्या वाहायच्या!''



रात्री गाद्यांवर बेडशीट घालायची वेळ आली की या मनिटल्यांचा चपळपणा दाखवणं सुरू... बेडशीट घालताना बेडशीटमध्ये घुसतात. तिसरीकडूनच बाहेर येतात... बेडशीटला फुगा दिसला की पंजा मारतात. हे काय वागणं झालं? मग सगळे अर्धा तास तरी त्याच कौतुकात. 'मांजरांमुळं दिवसभराचा थकवा कसा पळून जातो. लहान मुलासारखा कसा लळा लावतात' वगैरे. कसला आलाय चपळपणा! या पाची जणी मुलखाच्या आळशी. बघावं तेव्हा झोपेत. अंग आरामात पसरून किंवा उशीत खुपसून यांचा सतत आराम चाललेलाच असायचा. कुणी बास्केटमध्ये, कुणी फ्रीजच्या मागच्या जागेतल्या उबेत, कुणी अगदी बेडवर तर कुणी चौकातल्या सोफ्यावर आरामात पहुडलेलं. बरं, यांना म्हणे ऐकू येतं अफाट. सारखे कान हलतच असतात. पाहिलेत तुम्ही? पण ऐकू येतं हे त्या दाखवत नाहीत. आराम चाललेला असताना बाहेरचं दार वाजलं तरी यांची आरामाची तंद्री मोडत नाही. मग रात्री गादी घालताना दाखवलेली चुस्तीफुर्ती काय कामाची?

हळूहळू बघून बघून मला त्या ओळखीच्या झाल्या.






इना शुभ्र रंगाची, पण तिची शेपटी काळी. मऊसूत, स्लिमट्रिम. तशी प्रेमळ. मावशी खुर्चीवर काहीतरी वाचत बसली की तिच्या पायांना आपल्या खरखरीत जिभेनं इना चाटत राहायची. तिचे डोळे पिंगट म्हणून कदाचित ती बाकी चारींपेक्षा प्रेमळ होती.

मीना सारखी रोखून पाहायची घाऱ्या डोळ्यांनी. काहीही मनाविरूद्ध झालं की गुरकवायची. झोपली की घोरायची. तिचा रंग पांढरा नि पिवळा एकत्र केल्यावर होतो तसा. मीना उंच नि जाडीपण होती; त्यामुळं तिचा धाक वाटायचा. घरात नवीन पडदे लावले की तिची त्यांच्यावर झेप ठरलेलीच. 'काहीतरी पंज्यातून निसटलंय' असं तिला सारखं वाटत राहायचं, म्हणून ती जिथं तिथं नख्या मारायची. मावशीच्या घरातलं जुनं शिसवीचं टेबल, बाहेरचा टी पॉय तिनं तिच्या ओरखड्यांनी नखारला होता. पण मावशी म्हणायची, ''बघ, बघ... मीनाला कलेतलं कळतं. माणूस असती तर चित्रकार शोभली असती.''

डिकानं कॅडबरी हिसकावल्यामुळं मला ती राक्षसीणच वाटायची, पण तिचे डोळे भारी होते. मधाचे थेंब सोडल्यासारखे. अंगाची कमान करून ती आळस द्यायची तेव्हा मलाही आपोआप आळोखेपिळोखे द्यावे वाटायचे. भूक लागली की ती स्वयंपाकघरातून आतबाहेर फेऱ्या

मारायची. बशीत दिलेला खाऊ न सांडता खायची आणि खाऊन झाल्यावर मिशा पुसत शांत पडून राहायची. सकाळी मावशी उठली की तिच्याबरोबर लागलीच उठणारी एकटी डिकाच असायची.

डाय म्हणजे महाराणी... तिचे डोळे सुकलेल्या अंजिरासारख्या रंगाचे होते. एकदा ती माडीवरच्या खिडकीतून खालच्या पत्र्यावर पडली. वर परत येण्याइतकी मोठ्ठी झेप तिला घेता येण्यासारखी नव्हती. खाली उडी मारावी तर तेही अंतर फार होतं. मग काय करणार? मग काकांनी दोरखंडाला बास्केट बांधली आणि माडीतल्या खिडकीतून हळूहळू खाली सोडली. बाईसाहेब बास्केटमध्ये उडी मारून बसल्या. बास्केट वर आल्या आल्या जी टुणुक्कन् उडी मारली आणि गायब झाल्या की दोन तास पत्ताच नव्हता. घाबऱ्याघुबऱ्या झाल्यावत्या बहुतेक.



डॅमनिकासुद्धा कायम महाराणीच्या थाटात वावरायची. तिला खाण्यापिण्याचं सगळं ताजं-ताजं लागे. केक विशेष आवडीचा. तिच्यासाठी म्हणून मावशी दर आठवड्याला केक बनवायची. बिनअंड्याचा. आई तिला म्हणायची की अगं मांजरं मांसाहारी असतात... उंदरं खातात, चिमणी-कबुतरं पकडतात, झुरळं, पाली मटकावतात आणि तू काय ती वारकरी असल्यासारखा बिनअंड्याचा केक करतेस? मावशी म्हणायची, 'अगं, त्यांच्या जन्मजात सवयी त्यांच्याजवळ. आपण आपलं आपल्यापरीनं त्यांना वळण लावायचं. यापुढं काय करायचं ही त्यांची मर्जी!'

डॅमनिकाचे या वेळच्या सुट्टीत विशेष लाड चाललेत. आई म्हणाली, 'डॅमनिका बाई पोटुशी आहेत. पाळणा हलणार!' डॅमनिकाला मांजरबाळ होणार... झालं! म्हणजे आता मावशीचं माझ्याकडं अजिबातच लक्ष जाणार नाही. वर वर म्हणणार, 'माझी नमु गं ती', पण आतून डॅमनिकाचीच माया!

सगळा विचार करूनही न राहावल्यामुळं मी शेवटी सुट्टीत मावशीकडेच राहायला आले. मांजरांबद्दल मनात गुस्सा होता, पण मधेच लहर फिरली की ही मांजरं वागायचीही इतकं चांगलं की राग तात्पुरता का होईना, निघून जायचा.

मावशीच्या गल्लीतली लहान मुलं सुट्टीला त्यांच्या त्यांच्या मावशांकडं, आजीआजोबांकडं नाहीतर कुठंतरी फिरायला गेली होती. त्यामुळं गल्ली मोठ्या माणसांनीच भरलेली. वेळ घालवण्यासाठी मांजरांशिवाय पर्याय नव्हता. त्यांच्याशी न जमवून काय करणार? समझौता करावा लागला.

सकाळी तर हसून हसून पुरेवाट झाली. डायशी खेळताना खोलीतल्या मोठ्या आरशाजवळ गेले तर डाय आरशातल्या स्वत:च्या प्रतिबिंबाकडे बघून म्याऊं ऽऽ म्याऊं ऽऽ करत लांबून अंदाज घ्यायला लागली. प्रतिबिंबही तिच्यासारखंच हालचाली करत होतं. डायला वाटलं, दुसरं मांजर आलंय. म्हणून मग तिनं लांबून पंजा मारला. उडी मारण्यासाठी दबा धरून बसली. हळूहळू दबकत आरशाजवळ गेली नि तिनं

आरशातल्या प्रतिबिंबाला हुसकून घालवण्यासाठी जोरदार उडी मारली. डोकं धडकल्यावर बहुतेक दुसऱ्या मांजरीनं आपल्याला हरवलं असं समजून जी धूम पळाली ते तिच्या नेहमीच्या दप्तरात जाऊन बसली. बराच वेळ मग तिथल्या तिथं गुरगुरत राहिली. तासभर मजेत गेला.

माडीवर जाऊन डॅमनिकाची हालहवाल पाहाण्यातही वेळ बरा जाई. मावशीनं तिच्यासाठी जुन्या गोधड्या घालून आणि साडी लावून आडोसा केला होता. बेडरूमच म्हणा ना! रात्री ती बराच वेळ ओरडत होती. मला जाग आलीच. मावशी फेऱ्या मारत होती. म्हटलं, सकाळ झाली का? तर म्हणाली, ''नाही गं. पहाट होतेय. बाईसाहेबांची वेळ भरली वाटतं. नवे पाहुणे येणार घरात...''

सकाळी उठून मी माडीवर जाऊन पाहिलं तर डॅमनिकाच्या कुशीत तीन मांजरबाळं झोपली होती. अगदी इटुकली होती. केवढीतरी गोड दिसत होती. मला त्यांच्या डोळ्यांचे रंग पाहायचे होते. मावशी म्हणाली, ''अगं, ती माणसांची नाही, मांजरांची बाळं आहेत. लगेच डोळे उघडत नाहीत. घरी जायचा हट्ट केला नाहीस तर त्यांचे उघडलेले डोळेही पाहाशील.''

मावशीबरोबर माझाही अख्खा दिवस डॅमनिकाच्या तैनातीतच गेला.


एका रात्री उकडत खूप होतं म्हणून मी मावशीबरोबर वाड्यातल्या चौकातल्या कट्ट्यावर गादी घालून झोपले होते. चौकाच्या चौकोनी तुकड्यातून दिसणाऱ्या आभाळातल्या चांदण्या मावशी मला दाखवत होती. गोष्ट सांगत होती. ती ऐकता ऐकता गाढ झोप लागली. रात्री मांजरांच्या ओरड्यानं मला नि मावशीला एकदमच जाग आली. अंधारात मांजरांचे डोळे तेवढे लुकलुकत होते. एकदम मोठे दिसत होते. मला भीतीच वाटली. घरातली सगळीच माणसं जागी झाली. पटपट लाईट लावले, बॅटऱ्यांचे झोत टाकले तर काय? विहिरीजवळ साप होता. इना आणि मीना त्याच्यावर गुरकावत होत्या, पंजे मारत होत्या. त्याला जागचं हलू देत नव्हत्या. मी रडायलाच लागले. इना, मीनानं सापाला घाबरवलं नसतं तर तो आमच्या अंथरुणात आला असता का? बापरे! मला एकदम प्रेमच आलं सगळ्या मांजरांवर.

मोठ्या माणसांनी सापाला धरून रानात सोडलं. मावशीनं तर रात्री आनंदानं सगळ्या मांजरांना प्रेमानं पुन्हा दूध घातलं. 'गुणाची गं माझी बाळं!' म्हणत त्यांची दृष्ट काढली. घरी आजी असताना जशी अंधाराची भीती वाटत नसायची तसं मांजर असताना कशालाही घाबरायचं कारण नाही असं मला अचानक वाटायला लागलं. इना-मीनाचं सापाला भिववणं आठवत मी मावशीच्या कुशीत झोपून गेले.

चार-पाच दिवसांनी डॅमनिकाच्या इटुकल्यापिटुकल्या कापसाच्या गोळ्यांनी डोळे उघडले. माझ्याकडं डोळे मिचकवत मऊ मऊ मायेनं पाहिलं. त्या मऊसूत पिलांना मी खऱ्याखुऱ्या प्रेमानं गोंजारलं. मावशीनं ते पाहिलं.

नंतरची माझी सगळी सुट्टी मांजरमय झाली. सुट्टीनंतरचे दिवसही मांजरमय झाले... कारण?

कारण घरी जाताना, एका छोट्याशा गुलाबी बास्केटमध्ये, मऊ शाल घालून मावशीनं मला डॅमनिकाची दोन पिल्लं घरी नेण्याकरता दिली होती. त्यांची नावं काय ठेवायची, याचा विचार करतच मी घरी पोहोचले होते.



# बघता बघता...

निहाल घरी आल्यापासून नेहमीपेक्षा थोडा वेगळा वागत होता. संपदाला काही कळेना आज याचं हे नवं काय चाललंय? दार उघडल्यावर डोळे मिटूनच आत आला. बूट काढताना धडपडला, रॅकमध्ये बूट ठेवताना त्यातल्या चपलाही धडाधड पाडल्या. बाथरूममध्ये जाताना भिंतीला आपटला. बाथरूममध्येही पाडापाडी केली.

''चॉकलेट दूध ठेवलंय रे टेबलावर!'' अशी हाक तिनं दोनतीनदा मारली तेव्हा डोळे मिचकावत टेबलापर्यंत आला नि डोळे मिटून टेबलावरचा मोठा मग त्यानं सावकाश, पण चाचपडत दोन्ही हातात धरला नि डोळे मिटूनच दूध प्याला.

''निहाल, आज हा काय खेळ सुरू केलायस?'' असं विचारलं तिनं, पण तो तंद्रीतच होता. दूध प्यायल्यावर तो उठला आणि डोळे मिटून चालण्याचा खेळ त्यानं पुढं चालू ठेवला. 'दर दोन दिवसांनी नवं काही खूळ घेऊन येतो हा मुलगा!' म्हणत संपदा आपल्या कामाला लागली. इतक्यात काहीतरी खळ्कन फुटल्याचा आवाज आला. म्हणून धावत येऊन तिनं पाहिलं तर वाढदिवसाला माधवीनं दिलेली फुलदाणी एकाची दहा होऊन बसली होती. निहाल त्या तुकड्यांकडं पाहात मान खाली घालून उभा होता.

''निहाल, काय चाललंय काय तुझं? लक्ष कुठंय? पाडापाडी काय चाललीय? मघापासून मी काही बोलले नाही, पण तुझं वाढतंच चाललंय... समोरच्या गोष्टी दिसेना झाल्यात की काय?'' संपदाला राग आवरेना.

''आई, शाळेत एक नवा मुलगा आलाय... त्यांची बदली झाली म्हणून. डेविड. मुंबईतून आलाय. तुला माहितीए, त्याला अगं खरंच दिसत नाही. अजिबात दिसत नाही. त्याच्या सॅकमध्ये एक ट्रे इतकं मोठं काही



होतं. त्याला एक पेटी जोडलेली होती. त्यामधले थोडे खिळे मी हळूच त्याच्यासमोरच काढले आणि माझ्या कंपासात ठेवले... तरीही त्याला दिसलं नाही.''

''काय? दिसत नाही? आणि मुळात कुणाचं सामान घ्यायचंच कशाला? शाळेत येताना त्यानं तरी खिळे का आणावेत? तुला कशाला पाहिजे होते खिळे? माझ्या डोक्याला नवीन त्रास नकोत हं निहाल!''

''अगं, पण त्याला खरंच दिसतं की नाही हे चेक करण्यासाठी मी घेतलेत ते. आई, अगं, त्याला जराही... 'इतकं'ही दिसत नाही...'' निहाल डोळे बारीक करून बोटाच्या चिमटीकडं पाहात सांगत होता. त्याच्या चेहऱ्यावर खूप नवल होतं.

''हो का? पण मग तुमच्या शाळेत कशीकाय झाली अॅडमिशन?''

''मग कुठं? त्याच्या बाबांची बदली झाली म्हणून त्याला या शाळेत अॅडमिशन मिळाली. माझ्या बेंचवर टीचरनं जागा दिलीय त्याला. आमच्या बसनंच तो रोज येणारे आता.''

संपदानं निहालला फार काही प्रश्न विचारले नाहीत. आता अशा मुलाला नॉर्मल मुलांच्या शाळेत सांभाळून कसं घेणार, तो शिकणार कसा वगैरे बरेच प्रश्न तिला पडले होते. रात्री जेवतानाही निहाल त्याच्या त्या डेविडमध्ये गुंतलेला होता. डोळे मिटून खात होता. एकदम म्हणाला, ''आईग... बघ की... आपण डोळे मिटले तरी घास बरोब्बर तोंडातच जातो. नाकात जात नाही, शर्टात जात नाही... कसंकाय?''

सकाळी नेहमीप्रमाणं आईचा ओरडा खाऊन निहाल उठला. मग बराच वेळ तोंडात ब्रश ठेवून पेंगणं झालं. आईची भुणभुण वाढल्यावर मग तो खरा जागा झाला आणि त्यानंतर भराभर अंघोळ, युनिफॉर्म, दूध पिणं, वाटीतला बेसनाचा लाडू खाणं, टिफीन घेणं झालं. पसरलेली पुस्तकं-वह्या संपदानं आधीच सॅकमध्ये भरली होती त्यामुळं तो कार्यक्रम वाचला. ''चल आता. आटप. बसचा हॉर्न ऐकू यायची वाट नकोय बघायला. खाली जाऊन स्टॉपला उभा राहा निहाल. रोज रोज नको रे बोलणी खाऊ.'' संपदानं निहालला हटकल्यावर तो लिफ्टपाशी जाऊन उभा राहिला. शेजारचे देसाईकाका खाली चालले होते. निहालला पाहून त्यांनी हाक

मारली, ''काय रे पोरा ... लिफ्टनं कसला जातोस? ये माझ्याबरोबर. मजा करत पायऱ्या उतरूया. चल. काल म्हणाला होतास ना, उद्या उतरेन म्हणून. मग?''

''तो कसला पायऱ्या उतरतोय. आळशी कुठचा! जर्रा हातपाय जास्त हलवायला नकोत बघा काका या मुलांना. सगळं सोपं पाहिजे. टीव्हीवर कार्टून बघताना, तेनालीरामा आणि अकबरबिरबल बघताना सगळा आळस निघून जातो बघा यांचा. अवघडाए!''

''अगं संपदा, तू त्याला नको बोलू... तू कितीवेळा उतरतेस पायऱ्या सांग बरं?''

देसाईकाका म्हणूनच निहालला आवडतात. ते कुणालाही सरळ रागवू शकतात. त्यांच्यापुढं कुणाला काही म्हणताच येत नाही.

बस लगेच आलीच. चढल्या चढल्या निहालनं बसमध्ये सगळीकडं नजर टाकली, डेविड दिसतोय का बघायला. तो नाहीये म्हटल्यावर ड्रायव्हरकाकांना विचारलं तर ते म्हणाले, ''डेविड का कोण ...हां, नवीन मुलगा व्होय, तोच आसंन! पुढच्या स्टापला घ्यायची नवीन इन्ट्री.''

पुढच्या स्टॉपला डेविड उभा होता. त्याची आईही बरोबर होती. निहालला डेविड बसमध्ये कसा चढतो हे बघायचं होतं. खरं तर बसच्या पायऱ्या चढताना डोळे मिटून चढायच्या असं त्यानं ठरवलंही होतं, पण नेमक्यावेळी ते डोक्यातून निघून गेलं. डेविडच्या आईनं त्याला बसपर्यंत आणलं आणि त्याला सांगितलं कमी उंचीच्या, पण पाच पायऱ्या आहेत म्हणून. एका पायरीत थोडं अडखळल्यावर पुढच्या पायऱ्या तो नीट चढला. त्याची आईही मागून आली. इतक्यात निहाल ओरडला, ''डेविड, मी इकडं बसलोय. इथं ये.''

डेविडनं हसून मान हलवली. तो पुढं येत असताना डेविडची आई म्हणाली, ''तू निहाल का रे? हा सांगत होता मला काल.'' आणि मग तिनं थांबून डेविडला सांगितलं, ''तुझ्या डाव्या हाताकडून चौथ्या सीटवर निहाल आहे रे.'' सांगितल्याप्रमाणं बरोबर सीटजवळ येऊन डेविड थांबला. त्यानं पाठीची सॅक काढली आणि विचारलं, ''निहाल, वर कप्पा आहे का रे

ठेवायला?'' प्रश्न विचारतानाच तो हातानं चाचपडत अंदाज घेत होता. उत्तर मिळण्याच्या आधीच त्याला कळलं की कप्पा आहे. त्यानं आपल्या सॅकसाठी वर जागा करून घेतली आणि सीटवर बसला. निहालजवळ. वेगळाच नवा मित्र मिळालाय म्हणून निहालला कुतूहलही होतं आणि आनंदही. त्याच उत्साहात त्यानं डेविडला विचारलं, ''खिडकी हवीय?'' आणि लगेच त्यानंतर 'सॉरी... सॉरी' करत तो म्हणाला, ''तुला दिसत नाही हे लक्षात राहिलं नाही.'' पण डेविडला त्याचं काही वाटलं नव्हतं. सॉरीकडं त्याचं लक्ष नव्हतं. तो लगेच म्हणाला, ''चालेल खिडकी. थँक्यू!''

आता हा डेविड खिडकीत बसून काय बघणार असं निहालला वाटत होतं. बघूया... म्हणून तो त्याच्याकडं बघतही राहिला, पण तेवढ्यात होमवर्क पूर्ण झाला का? क्रीडास्पर्धेत कोण भाग घेणारे? नाटकात कुणाकुणाला निवडलं? ट्रेकला जायला घरची परवानगी मिळाली की नाही? या एकमेकांना विचारायच्या गोष्टीत डेविड खिडकीतून कसा बघतो हे बघणं मागं पडलं.

तेवढ्यात शाळा आलीच. निहालच्या डोक्यातली उत्सुकता जागी होती. डेविड गडबड न करता थांबला. सगळे उतरल्यावर मग त्यानं सॅक काढली. सीट्सना धरून न अडखळता पायऱ्या उतरला. निहाल त्यानं हाक मारायची वाट पाहत होता. त्याची हाक आल्यावर मग निहाल म्हणाला, ''मी तुझ्याइथंच उभा आहे. आता सांग वर्गात कसा जाणारेस? मला बघायचंय.''

''उद्यापासून बघशीलच तू, पण आत्ता मला सांग, इथून कुठल्या दिशेला जायचंय? हा आठवडा मी माणसांचा सराव करणारे. व्हाईट केन म्हणूनच आणली नाहीये. ती असली की कुणीच लागत नाही.''

निहालनं खाण्याची ॲक्शन करत उजवा हात वर घेतला आणि मग विचार करत तो म्हणाला, ''डावीकडे चल. दिशा सांगायचा जरा गोंधळ होतोय माझा.''

निहालनं डेविडचा हात धरत त्याला थोडं ओढलं तर डेविडनंच त्याला दुप्पट जोरात स्वत:कडे ओढलं नि म्हणाला, ''उजव्या हाताच्या

कोपराजवळ फक्त हात धर, ओढू नकोस. आणि जाताना वाटेत काय काय आहे ते न विसरता नीट सांग. सगळंच्या सगळं सांग.''

खरंतर कुणी 'हे कर, ते कर' अशी ऑर्डर दिली की मुळीच काम ऐकायचं नाही अशी निहालची पद्धत होती, पण डेविड कसा वागतो हे पाहाण्याची इतकी उत्सुकता होती की तो नेहमीसारखं न वागता शांत राहिला. मुकाट्यानं सांगायला लागला, ''आत्ता आपण शाळेच्या पाठीमागं ग्राऊंडवर बस उभ्या करतात तिथून चाललोय. डावीकडं सगळ्यांनी सायकली लावल्यात, उजवीकडं बस उभ्या आहेत. तिथल्याच एका कोपऱ्यात कचराकुंडी आहे. ती भरपूर भरलीय. बहुतेक काल कचरा नेला नाहीये म्हणून, पण आमच्या शाळेची कचराकुंडी भरून वाहात नसते. आजच झालंय असं. कडेला नळ आहे, थोडा गळतोय. आता इथून ग्राऊंड संपून शाळेच्या आत जायचा रस्ता आहे. पुढच्या गेटनं प्रायव्हेट व्हेईकल असणारे किंवा चालत, सायकलनं येणारे येतात. मागून स्कूलबसनं येणारे येतात हे लक्षात ठेव.''



इतक्यात डेविडला ठेच लागली म्हणून त्यानं 'आईग्ग आईग्ग' करत तिथल्या तिथंच दोन–तीन उड्या मारल्या. निहाल ओरडला, ''अरे थांब. सांगितलं होतं ना तुला, ग्राऊंड संपलंय?... म्हणजे मग पेव्हिंग ब्लॉक्स सुरू होणार एवढं कळत नाही? दिसत नाही तुला?''

''तुलाच दिसत नाही. पेव्हिंग ब्लॉक सुरू होताना उंचवटा आहे हे सांगितलं असतंस तर मी धडपडलो नसतो. तुला दिसलं नाही म्हणून मला लागलं आणि उलटं तू मलाच विचारतोस होय, दिसत नाही का म्हणून?''

निहालला स्वत:ची चूक कळली होती, पण रोज चालताना किंवा फिरताना कुठं काय आहे, पायाखालची जमीन कशी आहे वगैरे लक्षातच आलं नव्हतं. चूक मान्य करण्यापेक्षा त्यानं बाबांची युक्ती वापरली. विषयच बदलला! डेविडला वर्गात नेलं. प्रार्थनाबिर्थना आटोपून वर्ग सुरू झाला. आज पहिला तास गणिताचा होता. सगळ्यांनी पटपट लाँगबुक काढली. डेविडनं तो लांबलचक ट्रे बाहेर काढला. निहालनं विचारलं, ''अरे, कार्यानुभवचा तास नाहीये, गणिताचा आहे. हे काय काढतोस?''

''अरे, ही गणित पाटी आहे. यावरनं मी गणितं करतो. इथं पेटीत खिळे दिसताहेत नं? ते माझे आकडे आणि चिन्हं. बघ आता मी कसं करतो.'' डेविड जरा फुशारून म्हणाला.

सगळ्यांचंच लक्ष डेविडकडं गेलं. वेगळ्याच पद्धतीनं गणित करणारा म्हणून डेविड 'सेंटर ऑफ ॲट्रॅक्शन' झाला होता. शिवाय तो निहालचा बेंचमेट. त्यामुळं निहाललाही नेहमीपेक्षा जास्त मान मिळत होता. चक्क त्या आडव्या अठरा व उभ्या पंचवीस भोकाभोकांच्या ट्रेमध्ये खिळे अडकवून डेविड गणितं करत होता. निहालला वाटलं, भारीय हे... वहीवर पेनानं गणितं काय कुणाला पण येतात, असली गंमत वापरून गणितं करण्यात जास्त मजाय!

दुपारभर निहालबरोबर फिरून डेविड शाळा बघत होता. खरंच बघत होता. हात लावून, वास घेऊन बघत होता. त्याच्याबरोबर फिरताना निहालला कळलं की खालून त्याच्या वर्गापर्यंत पोहोचायला, टेरेसपर्यंत पोहोचायला किती पायऱ्या आहेत, वर्गापासून वाचनालय किती पावलांवर आहे! हवेतल्या नुसत्या वासावरून शाळेचा संडास कुठं आहे हे बरोबर कसं

कळू शकतं हेही त्याला कळलं. वर्गाच्या खिडकीतून कुठली व किती झाडं दिसतात याची माहिती डेविडनं त्याला विचारली. कितीतरी गोष्टी आपण डेविडला दाखवतोय की पहिल्यांदाच त्याच्याबरोबर पाहातोय हे निहालला कळेनासं झालं होतं. शाळा, वर्ग एकदम नवा झाल्यासारखा वाटत होता.

जेवायच्या सुट्टीत फिरत फिरत निहालनं पोळीचा रोल आणि डेविडनं सँडविच संपवलं. भरपूर हुंदडणं व त्या नादात वाटावाटीसाठी दिलेला जादाचा टिफीनही पोटात रिकामा होणं यामुळं डोळ्यांवर थोडी झापड येत होती. त्यात इतिहासाचा तास. मॅडमना कळू नये म्हणून निहाल डोळे जरा जास्तच मोठे करून टीचरचं ऐकल्यासारखं करत होता. डेविड चक्क झोपला. पण ते फक्त निहालला कळलं. त्याला दिसत नाही शिवाय तो नवा म्हटल्यावर त्याला टिचरनं काही विचारलं नाही. डोळे उघडे दिसले तरी काय, न दिसले तरी काय, तो झोपेल असं कुणाला वाटलंच नाही. तास संपल्यावर निहालनं त्याला चिमटा काढला. डेविड दचकून उठला. मग त्या दोघांनी एकमेकांना टाळी दिली.


निहालचं आणि डेविडचं गुळपीठ जमलंय हे एव्हाना शाळेत–घरात सगळ्यांना ठाऊक झालं होतं. दोघंही गळ्यात गळा घालायचे तसं छोट्या छोट्या कारणांवरून कचकून भांडायचेही, मात्र भांडण फार काळ टिकायचं नाही. निहालला डेविडच्या प्रश्नांची उत्तरं द्यायला फार आवडायचं. वडाचं झाड समजून सांगताना तर फार मजा आली. डेविडला वाटत होतं बटाटेवडे, मेदूवडे, भाजणीचे वडे कसे तळहातावर घेण्यासारखे लहान असतात तसंच वडाचं झाड इटुकलंपिटुकलं असू शकतं. वडाच्या जमिनीखालच्या भागात जशी मुळं असतात तशी वरून पण येतात आणि त्यावर निवांत झोके घेता येतात याची त्याला फारच मजा वाटली होती. दिवसभर मग कुठल्याही लोंबकळणाऱ्या भागाला हात लावून तो, ''ए निहाल, ही कसली पारंबी?' असं विचारत राहिला होता.

ट्रेकवर तर चांगलीच बोलणी खावी लागली होती दोघांना. डोंगर चढताना एका बाजूला दरी, एका बाजूला उंच कडा पाहून निहालला फार भीती वाटत होती. त्यात पुन्हा पावसामुळं निसरडं झालं होतं. रिमझिम पाऊस त्याला त्यावेळी नेहमीसारखा मजेचा नाही तर कटकटीचा वाटत



होता. निहालचा हात धरायला इतर मित्र तयार नव्हते कारण तो चालणाऱ्याला घट्ट धरून ठेवतो आणि स्वत:ही चालत नाही. नेहमीसारखा डेविडचा हात धरण्याचं धाडस त्याला होत नव्हतं कारण डेविडला दिसत नाही तर आपण पडल्यावर तो कसा आपल्याला उचलणार? डेविड मात्र मजेत होता. त्याला कशाची भीतीच वाटत नव्हती. तो ताठ चालत होता... मध्येच मान कलती करून वाऱ्याचा आवाज ऐकत होता. बगळ्यासारखी मान उंच करून पावसाचा मारा तोंडावर घेत होता. त्याला ना दरी दिसत होती, ना कडा; त्यामुळं कदाचित त्याला भीती वाटत नव्हती. डेविड कसा भरभर चालतोय, घाबरत नाहीये म्हणून त्याचं कौतुक होत होतं. त्यामुळं शेफारून तो जास्त भरभर चालायला गेला आणि ठेच लागली. सर म्हणाले, ''डेविड आणि निहालचं कॉम्बिनेशन एकदम सॉल्लीड आहे. एक अती धाडसी आणि एक अती घाबरट!'' आपल्याला डोळ्यांना सगळं दिसतं हे फायद्याचं की तोट्याचं हेच निहालला कळेना.

रात्री एका शाळेच्या पॅसेजमध्ये झोपल्यावर निहालला डेविडनं



विचारलं, ''काय रे, वर छतावर आपल्या घरावर असतो तसा स्लॅब नाहीये का? वेगळं काहीतरी आहे का?''


निहालला नवल वाटलं, कारण खरंच ह्या गावातल्या शाळेच्या छतावर स्लॅब नव्हे, उतरती कौलं होती. या वेगळ्या गोष्टीकडं निहालचं लक्षच गेलं नव्हतं. तू कसं ओळखलंस? असं विचारल्यावर डेविड म्हणाला, ''अरे इथं बोलल्यावर आवाज फिरून येताना जाणवत नाहीये. आपण जेव्हा आपल्या घरांमध्ये बोलतो तेव्हा तो कुठंतरी वर किंवा कडेला टेकतो असं मला जाणवतं. इथं मात्र फटी आहेत की काय आणि त्यातून आवाज हवेत मुरून जातो की काय असं वाटतं. बघ ना, आपण वर्गात बोलतो तेव्हाचा आवाज वेगळा असतो... वर्ग रिकामा असताना बोललो तर वेगळा असतो. आवाज तोंडातून बाहेर पडल्यावर कुठं कुठं टेकतो, थडकतो त्यावरून आजूबाजूला काही वेगळं आहे हे जाणवतंच ना? तुला नाही जाणवत?''

डेविडला काय उत्तर द्यावं हे निहालला कळेना. आजूबाजूला काय-काय असतं ते आपल्याला कळतं का? सांगता येतं का हे कळेना. मग त्यानं 'लिफ्ट नको, पायऱ्या वापरा' म्हणणाऱ्या शेजारच्या देसाईकाकांबद्दल डेविडला सांगितलं आणि मग घशातून त्यांचा आवाज काढत त्यांच्यासारखंच वाक्य म्हटलं, ''अरे मुला... जरा बघ आजूबाजूला. डोळ्यांच्याच जागी डोळे नसतात. कधीकधी आपण हातांनी, पायांनी, वासानं, पाठीनंसुद्धा बघू शकतो... उदबत्ती लावली हे कळायला तुळशीजवळ जाऊन चेक करावं लागतं का? नाकाला कळतं... म्हणजे नाकसुद्धा पाहातं की नाही? नाकाचे डोळे होतात का नाही?''

देसाईकाकांच्या नकलेमुळं निहाल आणि डेविड दोघांनाही हसू

आलं. दिवसभर दमल्यामुळं झोप यायला लागली होती. त्यानं झोपल्या झोपल्याच डेविडकडं मान वळवली तर सारखी उघडझाप करणारे त्याचे डोळे मिटले होते. मग निहालनंही डोळे मिटले आणि त्याच्यासारखं झोपायचा प्रयत्न केला. लक्ष देऊन ऐकताना त्याला जाणवलं, एका वेगळ्या पक्ष्याचा कुठूनतरी आवाज येतोय. त्यानं पुन्हा लक्ष देऊन ऐकलं... डेविडसारखं! आवाज येत होताच. डोळे मिटल्यामिटल्याच त्यानं डेविडला कुजबुजत विचारलं, ''ए, तुला तो नाजूक आवाज ऐकू येतोय पक्ष्याचा? खूप मोठा नाहीये, पण येतोय. ऐकतोयस नं?'' डेविड म्हणाला, ''हो रे ... ऐकतोच्चे... वेगळा आहे आवाज. आपल्याकडं नै येत हा...''

निहालच्या तोंडभर हसू पसरलं. तो आणखी आरामात झोपला... पांघरुणातून हात बाहेर काढून त्यानं तो डेविडच्या हातात ठेवला... मग डेविडनंही तो हातात हळूच दाबून ठेवला.



# दिपूचं गणित

खूप लांबून चालत यायचा म्हणे दिपू. त्याला दिपूच म्हणतात सगळे.

दिपू गप्प नि घुमा. त्याची वर्गात बसायची जागाही न ठरलेली. जिथं रिकामी जागा तिथं बसतो. त्याच्या गृहपाठाच्या वह्या पूर्ण असायच्या म्हणा तशा. कधी कधी नसायच्या तेव्हा टीचर चिडायच्या. शिक्षा द्यायच्या. शिक्षा दिली तरी तोंडातून हूँ नाही का चूँ नाही. तो कार्यानुभवात काहीतरी वेगळं करायचा. तर त्याचं कौतुक व्हायचं. कौतुक झालं तरी दिपू थोडं हसल्यासारखं करायचा... की भास व्हायचा सगळ्यांना कोण जाणे! दिपू ढ पण नव्हता नि हुशारपण. दिपू दंगेखोर नव्हता नि गप्पपण. दिपू दिसायला डॅशिंगपण नव्हता नि मिळमिळीतपण. तो कसा आहे कुणास ठाऊक. तो सतत कुठंतरी वेगळीकडेच बघत असतो. मी शाळेत नव्यानं आल्यावर सगळ्यांशी ओळख झाली. सगळे माझ्या घरी येऊन गेले. मी सगळ्यांच्या घरी जायचो. दिपूनं कधी मला बोलावलं नाही, दिपूही कधी आमच्या घरी आला नाही.

दिपूच्या डब्यात तो काय आणतो हे बघता आलं तर त्याला काय आवडतं, तो कसा आहे हे कळेल असं वाटलं. अर्थात कसं कळणार म्हणा! डब्यात आई स्वत:च्या मर्जीनं बऱ्याचदा काय काय भरते. आपली आवडीची गोष्ट नेहमी कुठं डब्यात असते? तसं असतं तर मी कायम पनीर भुर्जी, भेंडी मसाला नि नूडल्स आणले असते. कितीतरी दिवस मी दिपूला गाठायचं ठरवत होतो, पण अगदी नेमक्या क्षणी तो कुठं गायब व्हायचा नि शाळा भरायच्या वेळेत कुठून बेंचवर येऊन बसायचा कळायचं नाही. तो नेमका कसा आहे हे कळत नव्हतं म्हणून मला त्याचं खूप वाटायचं. एकदा चुकून त्याला तसं म्हणालो तर दोन दिवस त्यानं माझ्याकडं बघितलंपण नाही. कुणी मैत्रीत येणं त्याला आवडत नव्हतं बहुतेक.

मधेच एकदा आठ दिवस तो शाळेत आला नाही. कुणाला त्याचं फार काही वाटलं नाही. मी विचारून पाहिलं एक-दोन जणांना. त्यांचं



म्हणणं, तो असला काय नसला काय! त्याला कुणाचं काही पडलेलं नाही, मग आपल्याला कशाला त्याचं काय पडलेलं असायला पाहिजे? खरात टीचर कधीतरी अधेमधे त्याच्याशी बोलताना दिसल्या होत्या. त्यांना विचारावं का? माझ्या दीदीला सांगितलेलं मी दिपूबद्दल. ती म्हणालेली, 'तुला का पंचाईत सगळ्याची? मित्र काय कमी आहेत का तुला?' तेव्हा दीदीची मैत्रीण म्हणालेली, 'असं का गं सांगतेस त्याला, त्याला वाटत असेल एखाद्याबद्दल तर तो प्रयत्न करू दे की. तुला जसं गणित सोडवल्याशिवाय चैन पडत नाही, तसं त्याला दिपू सोडवल्याशिवाय चैन पडणार नसेल!' मला एकदम फ्रेश वाटलं दीदीच्या मैत्रिणीचं वाक्य ऐकून. एकदम एनर्जी आली. दिपूविषयी आपण सतत विचार करत असतो कारण दिपूला सोडवल्याशिवाय आपल्याला चैन पडणार नाही! दिपूला सोडवायचं कसं? गणित सुटतं. दिपू कसा सुटणार, तो गणित नाही. शाळेतल्या व्याख्यानमालेत एकांचं भाषण झालेलं. ते म्हणाले होते, 'कवी ग्रेस हे कवितेला पडलेले विलक्षण कोडे आहे.' म्हणजे माणसंसुद्धा गणित असतात, कोडं असतात, प्रश्न असतात. आपण प्रयत्न करायचा... पण प्रयत्न करायचा कसा?

दिपू बोलत नसला तरी दिपूविषयी विचारल्यावर कुणी ना कुणी काहीतरी सांगत होतं. त्यातनं दिपू 'सुटत' नव्हता. कुणी म्हणत होतं, दिपूचे बाबा खूप आजारी असतात, कधीच घराच्या बाहेर पडत नाहीत. कुणी म्हणतं, दिपूची बहीण वडिलांबरोबर गावाला गेलेली त्यांच्या कारमधून, तेव्हा दिपूच्या बाबांची गाडी घाटात उलटली. दिपूची बहीण त्यात गेली नि वडील आजारी झाले. दिपूची आई घरातून कामं करते. पैसे मिळवते. ती खूप सुंदर आहे. दिपू पूर्वी खूप दंगा घालायचा, नापास व्हायचा. बहीण गेल्यावर तो दंगा करायचा बंद झाला. पासपण व्हायला लागला.

खरात टीचरकडे गेलो. थेट विचारलं त्यांना, ''तुम्हाला माहितीए का दिपू कुठे गेलाय?''

''का रे? तुझा मित्र आहे का तो?''

''तो माझा मित्र आहे पण मी त्याचा मित्र नाहीये. तो मला आवडतो. तो दिसत नाहीये तर त्याला बरं नाहीये का असं वाटलं, म्हणून विचारलं. त्याच्या घराचा पत्ता द्याल प्लीज?''

''दिपूचा पत्ता हवाय? देते की. पण लांब आहे त्याचं घर. आपल्या शाळेकडून गावात जायच्या रस्त्यानं नं जाता, उलट्या दिशेनं बाहेर पडणाऱ्या त्या मठाकडच्या रस्त्यानं जा... तिथून बघ, दोन-तीन कारखाने लागतील... मग सलग शेती लागेल. तिथनं भिरवाई देवीचं मंदिर लागेल... तिथनं उजवीकडं वळ... 'रानजाई'कडे असा बोर्ड लागेल. दहा-पंधरा मिनिटं चालल्यावर डावीकडं वळ... दोन रस्ते लागतील. आमराईच्या रस्त्याला वळ. मग जे पहिलं बंगलीवजा जुनं घर दिसेल ते दिपूचं. फार्महाऊसवरच राहातात हे लोक. गावातलं घर नाहीये आता. पण हे बघ, आज गुरुवार. आज नाहीयेत कुणी तिथं. तू रविवारी जा. शनिवारी परत येणारेत मुंबईहून. दिपूच्या बाबांना दाखवायला नेलंय.''

खरात टीचरकडनं दिपूच्या घराकडं जाणारा रस्ता इतका लगेच कळेल असं वाटलं नव्हतं. पण कळाला. 'एखादं गणित सुटावं अशी आपली इच्छा असेल तरच ते सुटतं' असं टीचर म्हणायचे. म्हणजे ते म्हणणं इथंपण बरोबर आहे.

रविवार कधी उजाडतो नि आपण कधी जातो असं मला झालेलं.

आईनं दिलेल्या उपीटाचे दणादण घास मारून मी सायकलवर टांग टाकली. दीदीला फक्त सांगितलं, 'दीदी, गणित सोडवायला चाललोय.''

इतकी एक्साईटमेंट होती की दहा मिनिटं सायकल चालवून शाळेपर्यंत पोहोचता पोहोचता पाय दुखायला लागले. शाळेपाशी दोन मिनिटं थांबून दिपूला काय सांगायचं हे ठरवावं म्हटलं. काही सुचेना. तो अचानक मला दारात बघेल तेव्हा काय म्हणेल? तो बोलेल का? मैत्री करेल का? जाऊदे, होईल ते होईल म्हणत परत सायकल मारायला घेतली... दिपूच्या घराकडे जाणाऱ्या रस्त्यावरून जातोय म्हणजे एखादा गेम डिकोड करतोय असं वाटत होतं. बाबा म्हणतात, निर्हेतुक फिरावं कधीतरी. निर्हेतुक म्हणजे कुठल्या फायद्या-तोट्याचा विचार न करता. काहीही मिळेल किंवा जाईल असं न वाटता. तसं निर्हेतुक मला दिपूकडं जाता यायला हवंय. निर्हेतुक वगैरे मोठ्या माणसांची भानगड असेल. जाऊदे... असा विचार करत करत आमराई आलीपण! जुना दगडी बंगला आला. हे दिपूचं घर. जुनं असलं तरी नीट वाटत होतं. बंगला असला तरी छोटासा होता. फार्म हाऊस म्हणजे डोळ्यांसमोर लाकडी, कोन आणि कौलं असलेलं, चटयांचे पडदे असलेलं, असलं काहीतरी येत होतं. ते सगळं चुकलं. पण हे घरसुद्धा चांगलंच होतं. घरात जायला घसरगुंडी... म्हणजे रॅम्प होता. गुळगुळीत. त्याचे खालचे जमिनीतले टवके उडालेले. दारातून आत वाकून बघितलं, कुणीच नव्हतं हॉलमध्ये.

''दिपू आहे का? दिपूऽऽऽ''

कुणीच आलं नाही. हॉलमध्ये समोरच दिसला एका सुंदर मुलीचा मोठा फोटो. ती बहुतेक बहीण असणार दिपूची. आता नसलेली. भिंतीवर बरेच फोटो होते. फुलांचे, पक्ष्यांचे, घरट्यांचे, नद्यांचे, झऱ्यांचे, किल्ल्यांचे, माकडांचे, हत्तींचे. दुसऱ्या एका भिंतीवर कुठल्या कुठल्या सोनेरी केसांच्या माणसांबरोबर मोठ्या फोटोतल्या मुलीचे फोटो. तिसऱ्या एका भिंतीला फक्त बातम्यांची कात्रणं होती, ती जवळ जाऊन पाहावी लागली. लांबून अक्षरं दिसत नव्हती नि सगळं काही फक्त मराठी नव्हतं. अगदी जवळ गेलो इतक्यात दचकायला झालं... खांद्यावर हात आला नि मागून आवाज, ''काय रे? काय हवंय?''

अंगातून ताकद जाऊन धडपडलोच. म्हटलं, ''मी... शाळा, खरात



टीचर... आणि पत्ता दिला माझा दिपूला... नाही नाही. सॉरी! त्यांच्याकडून पत्ता घेतला... दिपूचा. तो आला नाही शाळेत. चौकशीला आलो म्हणून. विचारलं नाही आधी. सॉरी... म्हणजे काय झालं...''

''अरे हो... हो!! इतका काय घाबरा होतोस? दिपूला भेटायला आलास का? बरं वाटलं. कुणी येत नाही एरवी घरी. मी आई त्याची. तो जरा बाहेर गेलाय कॅमेरा घेऊन. तासाभरानं येईल, जेवायच्या वेळेत.''

''बरं बरं. मी वाट बघतो. मी जर फिरून घर बघितलं तर चालेल का?''

''न चालायला काय झालं! पण माझं जरा कॉम्प्युटरवर शेअर्सचं चालू आहे. आत्ता वेळ चुकवून चालणार नाहीये रे. मी येते अर्ध्या तासात तोवर तू फिरशील आपलाआपला? इथं समोरच्या खोलीत मी काम करतेय. तू घराभोवती फिर. वर जाऊन बघ. गच्चीवर जा. फक्त या इथल्या खोलीत जाऊ नको. दिपूच्या बाबांचा व्यायाम करून घेताहेत आमचे मामा. त्यांना डिस्टर्ब नको.''

''नाही. तिथं नाही जात. बाकीचं फिरतो दिपू येईपर्यंत. तुम्ही यालच की तोवर...''

दिपूची आई खरंच सुंदर होती. केस आडवी दांडी खुपसून वर कसेतरीच बांधलेले, पण चांगले दिसत होते. चष्मापण होता त्यांना. छान दिसत होता. आणि चिडखोर अज्जिबातच नव्हत्या त्या.

आधी घराभोवती जाऊया म्हणत मी एक चक्कर मारायला लागलो. फुलझाडं होती थोडी समोर. मागं कसंही गवत उगवलेलं. झाडांची वाळली पानं पडलेली. सगळ्या झाडांमध्ये छोटी मडकी ठेवलेली, भोक पाडलेली. त्यात पाणी होतं. दिपूनं हा प्रयोग शाळेतल्या शेतातपण केलेला. दोन पेरूच्या झाडांमध्ये झोका बांधलेला. तीन-चार झाडांवर चिमण्यांसाठी खोक्यांपासून बनवलेली घरटी लटकवलेली. दोन घरटी तर दिपूनं शाळेतपण बनवून आणलेली, पण कुठल्यातरी क्लबच्या लोकांनी त्याच दिवशी लाकडी सुबक घरटी शाळेला गिफ्ट दिली. दिपूच्या घरट्याला सगळे हसलेले. तेव्हा खरात टीचर आणि शिपाईमामांनी ती दिपूकडून मागून त्यांच्या घरी नेलेली. घरातलं खरकटं, भाजीपाल्याच्या काड्या

टाकण्यासाठी एक खड्डाही केलेला. त्यातनं खत कसं बनवायचं व त्याचा उपयोग काय याचा निबंध लिहिलेला दिपूनं, तेव्हा सगळे हसलेले. मोठ्यांदा! निबंधाचा विषय होता, 'मला कोण व्हावं वाटतं!' दिपू म्हणाला, मला खत व्हावं वाटतं. काहीही बघताना दिपूचं काहीतरी आठवत होतंच. टीचरनी 'नेमकं खतच का व्हावं वाटतं हे स्पष्ट केलं नाहीयेस' असं म्हटल्यावर म्हणाला, 'नको असणाऱ्या गोष्टी एकत्र केल्या. त्या मिळून उपयोगी पडल्या. त्यांचं खत झालं. खत न बोलता उपयोगी पडतं. खड्ड्यात सगळं कुजल्यावर वास येतो, पण खत बनल्यावर वास येत नसतो. मला तसं बनायचं आहे.' त्यानंतर काही दिवस सगळे दिपू आला की खत आलं म्हणायचे. मराठीतलं खत. हिंदीतलं खत नव्हे. दिपूचं असं काहीतरी वेगळंच.

विचार करत करत मी बागेतून घरात आलो, पायऱ्या चढायला लागलो. दोन खोल्यांतली एक उघडी होती. शिरलो आत. ती दिपूचीच खोली कारण आमची पुस्तकं नि वह्या टेबलावर दिसत होत्या. तिथंही फोटोंची भिंत होती. हे फोटो वेगळे होते. सुंदर सुंदर नव्हते. फोटो बघताना धडधडलं. एका फोटोत टॅब्लेट्सच्या खूपशा स्ट्रीप्स, औषधांच्या बाटल्या, कसलीकसली तेलं, कापूस, बॅण्डेज आणि मागं त्याच्या बहिणीचाच, तो हॉलमधला आहे तसा फोटो. एका फोटोत व्हीलचेअरच्या चाकात बसलेलं मांजर आणि व्हीलचेअरमधून खाली मांजराकडे येणारा हात फक्त. एका फोटोत कॉम्प्युटरवर काम करत बसलेली दिपूची आई, ती पाठमोरी आणि तिची भिंतीवर दिसणारी तिच्या अंगापेक्षा मोठी सावली. पाण्यातली पावलं. गटाराजवळ झोपलेला भिकारी आणि त्याच्याजवळ झोपलेली तीन कुत्री. एक वाकडंतिकडं वाढलेलं झाड आणि त्याच्या बुंध्याशी खूप तुटक्या चपला. एक मोठीच्यामोठी भिंत आणि तिच्या टोकावर दिसणारी फुलं. व्हीलचेअरवर बसलेला पाठमोरा दिसणारा माणूस आणि त्याच्या व्हीलचेअरचं दगडात रूतलेलं चाक. ते चाक वाकून पाहणारे एक दणकट आजोबा. हॉलमधल्या मुलीच्या सगळ्या फोटोंचा मिळून काढलेला एक फोटो. खूप राख्या आणि शेजारच्या निरांजनातून येणारा धूर असा एक फोटो. खूपसे, नुसते गुडघ्यांपासून खालून दिसणारे पाय. स्वयंपाकाची केलेली तयारी, त्यात वाकड्यातिकड्या कापलेल्या भाज्या. गॅसवरच्या

पसाऱ्यातून दिसणारी टम्म फुगलेली पोळी. कापलेलं प्लॅस्टर. केवढेतरी फोटो! या फोटोंच्या भिंतीसमोरची जी भिंत होती तिला लागून एक शेल्फ होतं. लाकडी. त्याला लागून दिपूच्या फोटोतल्या बहिणीचा हातात कॅमेरा घेऊन उभा असलेला दाराएवढा मोठा फोटो. शेल्फवर खूप पुस्तकं, अल्बम्स.

मी एखाद्या गोष्टीत शिरलोय किंवा गणितात असंच मला वाटायला लागलं. दिपूची आई म्हणाली की तो कॅमेरा घेऊन बाहेर पडलाय, येईल. म्हणजे हे फोटो त्याचे, त्यानं काढलेले! माझी मैआजी बोलायची नाही. कुठल्यातरी तापानं तिची वाचा गेली असं बाबा म्हणायचे. पण ती खोकली तरी आईला कळायचं की तिला काय हवंय. तिनं डोळे कसे केले तर तिला कुठल्या रंगाचा गाऊन घालावा हेपण आईला कळायचं. मी आवाज न करता घरात शिरलो तरी खोलीत झोपलेल्या आजीला मी आलोय हे कळायचं नि ती 'अं...अं...अं...' करत हाक मारायची. ती खास माझ्यासाठीची हाक होती तिची.

दिपूला कशी हाक मारायची हे मनात ठरवत मी बाहेर आलो. पायऱ्या उतरलो. तितक्यात हॉलमधल्या 'जाऊ नकोस' असं सांगितलेल्या खोलीतून व्हीलचेअरवर बसून एक काका बाहेर आले. ते खूप बारीक होते. दाढीमिशावाले. त्यांनी माझ्याकडे बघितलं आणि हसले... बाहेर जाणाऱ्या आजोबांना म्हणाले, ''नीट घेतलात ना पेनड्राईव्ह? उद्या येताना फोटोच्या प्रिंट्स आणा... दिपू खूश होईल. आणि हो, मॅट फिनिशचे आणा बरं का. मागच्या वेळी विसरलात आणि ग्लॉसी आणलेत.''

व्हीलचेअरवाल्या काकांनी व्हीलचेअर माझ्याकडे वळवली नि म्हणाले, ''आमच्या दिपूकडे आला आहेस का रे तू? स्पर्धेसाठीचे फोटो तुझ्याकडे द्यायचेत का?''

काय उत्तर द्यावं मला कळेना, मी म्हटलं, ''मी जातो. खूप उशीर झालाय.''

धडपडतच मी दाराशी जाऊन चप्पल घातली.

ते म्हणाले, ''अरे थांब, येईल तो. गुंतला असेल फोटोत. तुला बोलावलंय इतकं तर लक्षात असेल त्याच्या.''

मी म्हटलं, ''नको, माझं गणित सुटलंय. घरी जातो लगेच. मला दीदीला सांगायचंय, गणित सुटलंय म्हणून. गणित आवडलंय.''

'अरे, काय बडबडतो आहेस?' असं ते विचारत होते तोपर्यंत मी थांबलोच नाही. दिपू घुमा असला तरीपण घुमा नव्हता. मला कळलेलं हे! मी त्याचा मित्र होतो, आता तो माझा मित्र व्हायला हवा आहे... मी त्याला मित्र करणारच आहे! 'गणित आवडलं तर सुटतं' असं टीचर म्हणाले होते. मला गणित आवडतं. मला दिपू आवडतोय.



# जॉयस्टिक

आज सखी फार म्हणजे फार म्हणजे टोटल खूश होती. घरी सगळे चिडवायला लागलेले की 'आता काय बै... मज्जाय एका मुलीची. कुणीतरी लाडकं येणारंय घरी लवकर. मग काय, सखी लक्ष देणार नय कुणाकडं... मी बरी नं माझी सखी बरी असं म्हणणार आमची सखी...' हे सगळं ऐकताना सखी कैच्याकै खूश होत होती. गाल दुखून आले लाजून नि हसून. मज्जाच! हे सगळं चालूच होतं इतक्यात पूलगल्लीवरचा अभीदादा भेटायला आला. दादा नि सखीची गट्टी माहिती नाही असा माणूस नसणार कोल्हापुरात. आल्या आल्याच दादानं सखीच्या आईकडं बघत फर्मान सोडलं, ''प्राजक्तादी, अद्रक डली हुई बढिया चाय बनाकर थर्मास दे दो. मै और सखी आज रंकाळा पे पार्टी करनेवाले है!''

सखी तयारच होती. सखीनं आपली मॅन्युअल व्हीलचेअर समोरच्या दारातल्या रॅम्पवरून झुईंकन खाली घेतली नि दाराबाहेर आली. आता रस्त्यावरून मात्र तिची तिला ही व्हीलचेअर फार चालवता येणार नव्हती. रस्त्यावरचे खड्डे, चढउतार नि ट्रॅफिक; शिवाय रंकाळ्यावरून अंघोळी करून बाहेर येणाऱ्या म्हशी यातून व्हीलचेअरच्या रिमवर हात भरभर फिरवत वेग घेणं अगदी अशक्य. त्यामुळं अभीदादानं व्हीलचेअरचा ताबा घेतला. दोघंही रमतगमत निघाले. बडबड अखंड चालूच होती. दादा नुकताच माऊंटिनिअरिंगचा कोर्स करून आलेला. तो तिथलं काय काय सांगत होता. मनातून सखीला वाटत होतं, आपण असं काहीच वेगळं सांगू शकत नाही. एकेकटं करू शकत नाही. जगात एकटं एकटं सगळं करू शकण्याचा आनंद किती मोठा असतो नि आपल्याला तसं काही कधीच नसणार!

''अरे व्वा! काय, कुठं निघालीय सखी? कशीय आता तब्येत? आणि अभी, तुझं कौतुक वाटतं बाबा! शक्य तेव्हा तू या पोरीला फिरवतोस, तिचं मन रमवतोस. पुण्य लागणार तुला.'' जाधवकाकांच्या गोडगोड आवाजातल्या या बोलण्यावर सखीच्या भुवया वाकड्यातिकड्या होणार, डोळे असेतसे फिरणार हे अभीला ठाऊक होतं. अभीनं हॅहॅहॅ करत तिथनं व्हीलचेअर पटकन पुढे नेली. सखीच्या पद्धतीप्रमाणं... झुईंकन!



‘‘काय रे दादा, हे सगळे लोक बोअर कसे होत नाहीत तोच तोच प्रश्न परत परत विचारून? मी व्हीलचेअरवर आहे, म्हणजे काय सतत आजारी असते का? म ला खू प्प रा ऽऽऽऽ ग येतोय. आणि तुलापण आवडतं माझ्याबरोबर यायला म्हणून तू येतोस नं? मग तू सांगत का नाहीयेस या सगळ्यांना पुण्यबिण्य नाही म्हणून. सखी मैत्रीणंय म्हणून!’’ सखी कुरकुरली.

‘‘अगं, हो! आवर स्वत:ला. तुलाही माहिती झालंय नं लोक कसे बोलत राहातात ते. तू बोअर होत नाहीस सतत त्याच त्या गोष्टीवर चिडून? लोक मोठे होत नाहीत तर तूपण बारकीच राहतेस की!’’

हे असं चिडचिडं वातावरण झाल्यावर थोडा वेळ अभी नि सखी दोघंही गप्प झाले. रंकाळ्याच्या रस्त्यावर असणाऱ्या बागेला पास करून पुढे जाताना भरपूर पक्ष्यांचा एकदम चिवचिवाट नि कावकाव कानावर आली. दोघांचेही मूड जरा हलके झाले. शिवाय सुंदर संध्याकाळ! सूर्य रंकाळ्याच्या पाण्यात बुडायला लागला होता. त्याच्या केशरी रंगामुळं पाणीही मऊमऊ उबदार वाटत होतं. उन्हाळ्यामुळं पाणी खाली गेलं होतं, त्यामुळं संध्यामठ पूर्ण दिसत होता.

‘‘हे असं बघत भेळ खायला मजा येते नं सखडे? एऽऽऽ मिर्चीपण खाती का आता? खाताना खाली बघा जरा. ए, बोल की… पुरीसारखं टम्म फुगून बसायला आलोय का इकडं?’’ अभीला कळत होतं की अजून मूड जागेवर आलेला नाही.

खरंतर सखीला कित्ती काय काय शेअर करायचं होतं. सांगायचं होतं की… दादा रे, ही व्हीलचेअर रिमला धरून स्वत: चालवावी लागते तशी ‘ती’ नाही चालवायला लागत… तिला पॉवर चेअर म्हणायचं असतं, पण सगळे आता ‘तिला’ ‘सखीची सखी’ म्हणत कसे चिडवताहेत… पुण्याला व्हीलचेअरसाठी गेल्यावर त्या लोकांनी कसं माप घेतलं… काय काय प्रश्न विचारले, फोटो काढले, ती व्हीलचेअर कशी चालवते याचे व्हिडीओ बघितले… एक न दोन, कित्ती कित्ती होतं आज सांगण्यासारखं! पण नेमका जाधवकाकांनी मूड घालवला! दरवेळी हे असं होतं… लोकांना काय प्रॉब्लेम असतो, एखाद्याला पाय असून चालता नाही आलं तर? गरज असेल तिथंच फक्त कुणी मदत केली तर का म्हणतात सेवाबिवा नि

पुण्यबिण्य?

'आऽऽऽऊंऽऽऽऽग्गग्गऽऽऽ' सखी कळवळली. ''काय रे दादा, चटका बसला नं मला! कुचकट.''

''अगं, तू तप करायला बसल्यासारखी ध्यान लावून बसलीवतीस. म्हटलं, गरम चहानं तुझी तंद्री मोडावी,'' अभी चहाचा ग्लास नाचवत म्हणाला. खरंतर पाण्याच्या छोट्या छोट्या लाटांकडं एकटक बघताना राग हळूहळू कमी झालेला. चहा तर आवडता. एकदम उत्साहात ती म्हणाली, ''दादा, आता कसं वाटेत कुणी भेटलं नि काहीतरी म्हणायला लागलं की तू थांबतोस. मला थांबावं वाटत नसेल तरी मला थांबावं लागतं कारण माझी व्हीलचेअर तर तुझ्या हातात असते. आणि मागे मी एकटीच पुढे गेले तेव्हा लोकांनी मलाच नावं ठेवली; शिवाय हात दुखले ते वेगळंच. आता ही आपली नवी पॉवर चेअर येईल तेव्हा असं नसेल ना? कस्सली मज्जा येईल. मग तू मला नाही, मी तुला नेणार! मग बिचारे लोक कुणाला करणार चुक्‌चुक्‌... त्यांच्याकडं बघत बघत या संपूर्ण रंकाळा तलावाच्या गोलाला मी एका दमात चक्कर मारणार! भारी नं?''

''सखी, सगळे लोक काही वाईट नसतात अगं. त्यांना काय वाटतं ते पटकन सांगता येत नाही. मग ते वेगळंच बोलतात.''

''ए दादू, तू आता लेक्चर देऊ नको. आत्ता मूड नाहीये. तू सांग, परवा दिवशी पुण्याला जायचंय व्हीलचेअर आणायला. तू येणारेस?''

''आवडलं असतं गं, पण पाहुणे येणारेत. आईला मदत हवीय. हं, पण एक प्रॉमिस, तू येशील तेव्हा स्वागताला तैय्यार असेन! आणि का गं, भेळ का उरवलीस?''

''ऐक नं दादा, मला ना, भूकच लागत नाहीये. इतकी एक्साईटमेंट वाटतेय की मी जेव्हा आपली आपण चालणारी व्हीलचेअर वापरेन तेव्हा मला कसं वाटेल? भीतीपण वाटतेय की एवढी आणतायत बाबा माझ्यासाठी नवी चेअर आणि मला रस्त्यावर चालवता नाही आली तर? 'फार बै ट्राफिक वाढलंय कोल्हापुरात. आमच्यासारख्या धडधाकटांना चालता येईना,' असं एकच घोकत राहतात आजी नि आत्या. नवी चेअर आल्यावर जास्त बाहेर जायचं नाही असं म्हणत नाहीत मला डायरेक्ट;

पण ‘असं’ म्हणत राहातात. मी चांगली पाचवीत जाणारे आता. मला काय कळत नाही होय रे त्या असं का म्हणतात ते?’’

‘‘जाऊदे नं सख्या. तू या सगळ्याचा विचार करण्यापेक्षा असं का नाही बघत की तुझी नवी पॉवर चेअर खरी ‘पॉवर’ म्हणून तू कशी वापरशील... तू कुठे कुठे जाशील... कशी खरेदी करशील... नवे प्लॅन कर माकडू चिडचिड करण्यापेक्षा. आणि न चालण्याची तुला सवयच आहे ना? तू जमिनीवर पाय कधी टेकवलेलेच नाहीस. म्हणजे त्या गोष्टीचं दु:ख तुला वाटतच नाही. तुझ्या मित्रमैत्रिणींनाही वाटत नाही. नेहमी तेच ते बोलणाऱ्यांची सवय समजून बाजूला टाक. मज्जा कर राणू...’’

अभीशी बोलून सखी एकदम खुशीत आली. उद्याचा एकच दिवस. परवा पुणं आणि मग ‘पॉवर चेअर’! सखीला रात्रभर स्वप्नं पडत होती. स्वप्नात सखीच्या चेअरला स्केटिंग लावलं होतं नि व्हीलचेअर जोराजोरात धावणाऱ्या माणसांहून वेगात पळत होती. वाटेत नदी आली... मग चेअरची लगेच होडी झाली... वाटेत डोंगर आले नि चेअर घोड्यासारख्या टापा टाकत डोंगर चढून गेली. स्वप्नंच स्वप्नं! सकाळी उठल्यावर वाटायला लागलं की कधी एकदा रात्र येते, आपण झोपतो नि कधी एकदा दुसरा दिवस उजाडतो. संपूर्ण दिवस सखी अगदी बेचैन होती. भूक नाही की तहान नाही की टीव्ही नाही की फिरणं नाही की वाचणं नाही. रात्री झोपही येईना... ती घड्याळ घालूनच झोपली. दर एकदोन तासानं बघत राहिली की वाजले का सहा. शेवटी एकदाचं सगळं आवरून सकाळी सातला ड्रायव्हरकाकांनी कार सोडली तेव्हा तिनं हुश्श केलं.

कारची पुढची सीट अर्थातच सखीची मक्तेदारी. जेव्हा बुडाखाली दोन उशा घ्यायची तेव्हा कुठं ती खिडकीतून बाहेर पाहू शकायची. मागे पळणाऱ्या गुळगुळीत चिकन्याचुपड्या रस्त्याकडे एकटक बघताना सखी सतत इमॅजिन करत होती की आपण बसलोय पॉवर व्हीलचेअरवर आणि सगळ्या वाहनांना मागं टाकत चाललोय झुईंझुईंझुईंझुईं. मागे बसलेल्या आईबाबाआत्याकडे आज सखीची कसलीच भुणभुण नव्हती. नेहमीप्रमाणं तिनं आज ‘हीच का साडी’ नि ‘तोच का शर्ट’ अशीही तासणी केली नाही आईबाबांची. तिचं सगळं लक्ष पुण्याकडं लागलेलं.

‘‘छे! इतकं वेगात जाऊन अजून साताराच! काय हो ड्रायव्हरकाका,

कधी येणार पुणं? आज तुम्ही इतकी रमतगमत का गाडी चालवताय?''

''नाही गं पोरी. गाडी बराबरच चालवतोय मी. तू गाडीपेक्षा जास्त धावायलीस. उलट मलापण बघायचीय तुझी नवी गाडी, म्हणून मी सायबाला म्हणालो... मी जातो गाडीवर. दुसऱ्या कुणाला नगा पाठवू. मीच भरभर नेनार नं तुला? थांब, गाणी लावतो मंजी भराकदिशी यील पुनं,'' ड्रायव्हर काका म्हणाले.

कधीही कुठल्या गावाला जायचं असेल तर सखीचे बाबा पारगावकरांकडं गाडी सांगायचे. ते व्हीलचेअर बसेल अशी मोठी डिकी असणारी गाडी द्यायचे. आज तर इनोवा होती. शेवटी शंभर किलोची पॉवर चेअर घेऊन यायचं म्हणजे खायचं काम नाही.

वळणंवळणं घेऊन चेअर मिळणार असलेल्या इमारतीजवळ येऊन पोहोचल्यावर सखीची गडबड भयंकर वाढली. तिची मॅन्युअल व्हीलचेअर डिकीतून काढून, उघडून त्यावर शिफ्ट होईपर्यंत तिनं कुणाला काही सुचूच दिलं नाही. ती शिफ्ट झाल्या झाल्या चेअरच्या ऑफिसातले दादा रॅम्पवरनं घेऊन जायला आले. तिथं त्यांनी पाणी, चहा विचारलं. सखी म्हणाली, 'व्हीलचेअरचं विचारा की, चहात कुणाला इंट्रेसंय?' पंधरा मिनिटं सखी त्या ऑफिसात आतबाहेर करत होती, सगळे तिच्या गडबडीकडं कुतूहलानं बघत होते. काऊंटरवर जाऊन दर दोन मिनिटांनी ती भुवयांचं धनुष्य वरखाली करत रिसेप्शनिस्टकडं बघायची. रिसेप्शनिस्टलाही सुचेना म्हणून तिनं दोनदा फोन करून पॉवर व्हीलचेअरचा डेमो दाखवणाऱ्या मिश्रांना बोलावलं. ते दरवाज्यातून आत आल्या आल्या सखीकडं पाहून रूंद हसले नि त्यांनी तिला आतआतआतल्या खोलीत नेलं आणि कोपऱ्यात बोट केलं. कोपऱ्यात 'ती' होती. सखीची पॉवर चेअर! काळ्या रंगाच्या आरामशीर वाटणाऱ्या कुशनची, भक्कम चाकांची नि बुडाशी न दिसणाऱ्या बॅटऱ्या असणारी ती देखणी चेअर बघून सखीनं न राहवून टाळ्या वाजवल्या. मिश्रा म्हणाले, ''बेटा, आपको इसका कार्य बताता हूं, फिर आप बैठो और हम लोग तालियाँ बजाएंगे.''

त्यांनी पॉवर चेअरचा चार्जर नि ती चार्ज कुठून करायची हे दाखवलं. बंदिस्त असणाऱ्या बॅटरींची जागा दाखवली. तिथले तिला पॉवरवर नि मॅन्युअलवर टाकायचे खटके दाखवले नि म्हणाले, ''ये

तुम्हाला राईट हॅण्ड का जो हॅण्डरेस्ट है वो इम्पॉरटंट! उसपर जो की पॅड है उसमें बिलकुल कन्फ्युजन नहीं. एकदम युजर फ्रेंडली. ह्ये वरचा बटन पॉवरचा. ते तू दाबले की चेअर चालू पडती बरका रे सखी. अॅण्ड नीचे एक से पांच तक स्पीड, कम ज्यादा करू शकते तुमी. हे हॉर्न. नि हे सगळ्यांत इम्पॉरटंट, 'जॉयस्टिक!' हिला तुमी जे दिशा देनार ती दिशा पकडून हे चालनार. मागे, पुढे, या बाजूने, ती बाजूने, सगळं यावरनं जमनार तुला. चलो आता बसा.'' हिंदीइंग्रजीमराठीचं मिश्रण करत बोलणाऱ्या मिश्रांचं नाव मिश्राच कसं बरोबर; ते दादाला नक्की सांगायचं असं मनातल्या मनात सखीनं ठरवलं. मिश्रण करणारे मिश्रा.

सखीनं पॉवर चेअरजवळ स्वत:ची साधी हातानं चालवायची चेअर लावली नि हॅण्ड रेस्ट मागं टाकून ती अलगद पॉवर चेअरवर जाऊन बसली. भ्भारी फिलींग एकदम. व्हीलचेअर पुढे नेण्याकरता तिचे हात सारखे साध्या चेअरच्या रिमला जातात तसेच जात होते. सवयीनं. मिश्रा म्हणाले, ''स्टार्ट पॉवर अॅण्ड होल्ड जॉयस्टिक बेबी. आणि हो, सावकाश... एकदम स्लो...''

सखीनं पॉवर बटण दाबलं नि जॉयस्टिक सावकाश पुढे दाबली. चेअर एकदम पुढे गेली, मग मागे, मग या बाजूला, मग त्या बाजूला. हॉर्न दाबला... टूंटूंटूंटूं वाजला. ती खदाखदा हसून म्हणाली, 'कोल्हापुरातला डास यापेक्षा जोरात घुईंघुईं करतो,' पण मजा येत होती.

आ प लं आ प ण पुढे ऽऽऽ जायचं, मागेऽऽऽ यायचं. सगळं आपल्या हातात! वॉव! आपण जागेवरून हलायचं की हलायचं नाही हे आपल्या मनाप्रमाणं नि आपल्या हातात! हे जगात भारीय!!

तासदोन तास प्रॅक्टिस झाल्यावर मिश्रांचं समाधान झालं आणि सगळे निघाले कोल्हापूरला. रात्री पोहोचल्यावर दाराशी अभीदादा वाटच बघत होता. तीन जणांनी मिळून चेअर डिकीतून उतरवली. सखीचा चेहरा बघितल्यावरच त्याला कळलं की आता सखीकडं सांगायला खूप काही आहे. त्याला मौका नाही. त्यानं आणलेली पेस्ट्री कापून 'पॉवर चेअर'चं स्वागत केलं नि ठरलं की दुसऱ्या दिवशी संध्याकाळी त्यानं यायचं व पॉवर चेअरची प्रॅक्टिस घ्यायची.

आत्यानं आईला सांगून सकाळी शेजारच्या पाच बायकांना व्हीलचेअरला हळदीकुंकू लावायला बोलावलं. सखीला विचित्रच वाटलं, पण बाबा म्हणाले, 'सखी, अगं तुझ्या नव्या मैत्रिणीचं स्वागत करायची ती त्यांची पद्धत. त्यांना कौतुक वाटतंय, तुझं, तुझ्या सखीचं.' पॉवरचेअरच्या कौतुकाबद्दल सखीला काहीच प्रॉब्लेम नव्हता. दिवसभर ती आनंदात तरंगत होती, चेअरकडं नजर टाकून तिला हात लावत होती. संध्याकाळी दादाचा फोन आला, 'तयार हो, येतोय पाच मिनिटांत!' सखी मन लावून तयार झाली. लाल रंगाचा सुंदर फ्रॉक, डोळ्यांत काजळ, पिटुकली टिकली, हातात घड्याळ, पायात मोजे नि सुंदर लाल लेस लावलेले काळे बूट. एरवी ते बूट ती घालायची नाही, कारण अनोळखी लोकांना वाटायचं की बूट घातलेत नि चालत नाही; हे काय विचित्र! आता तिला सुंदर दिसायचं होतं. नि आई म्हणते तेही बरोबर, खायचे दात महत्त्वाचे व दाखवायचेही. दादा आला तेव्हा सखी तिच्या मापानुसार बनवलेल्या पॉवर चेअरवर बसून तयार होती. पॉवर बटण चालू करून तिनं घराचं दार ओलांडलं, रॅम्पवरून जरा जोरातच खाली आली... ''अग्ग, सावकाश! अभी, तिला वेग वाढवू देऊ नको रे. जरी ती भरभर चालणाऱ्या माणसांइतकीच जोरात धावू शकते तरी माणसांना अशा धावणाऱ्या वाहनांचा सराव नाहीये... आवर तिच्या उत्साहाला,'' बाबा ओरडले. अभीदादानं हात उंचावून सांगितलं, 'मी आहे. डोण्ट्च वरी!'

गल्लीच्या कोपऱ्यापर्यंत जायचं असं ठरवून सखी व दादा पुढे गेले. दादा प्रचंडच खूश झाला, म्हणाला, 'काय टेक्नॉलॉजी आहे सखे, आता चालून माझे पाय दुखतील नि तुझी चाकं मात्र उत्साहानं फुरफुरत पुढं जातील!' सखीनं घर ओलांडल्यावर वेग एकाचा तीन केला. एका विशिष्ट गतीत चेअर पुढं चालली होती. सगळे वळून वळून सखीकडं बघत होते. सखीला सगळ्या अंगात आनंद फिरूनफिरून ती फुगेल फुग्यासारखी असं वाटायला लागलं.

''दादा, असं वाटतंय ही जॉयस्टिक हातात आहे म्हणजे सगळं जग माझ्या हातात आहे. मी कंट्रोल करतेय सगळं असं वाटतंय. बघ ना दादू, माझे केस वाऱ्यानं उडताहेत, आज माझ्या माझ्या वाऱ्यानं माझे केस उडताहेत. कस्सलं भारीये हे!''

''सख्या, मस्त! आलो बघ आपण ठरल्याप्रमाणे. आता काय करायचं? जायचं पुढं गर्दीत? महाद्वाररोडवर जायचं?''

सखी म्हणाली ''जायचंच!''

महाद्वार रोड सखीचा फार्रफार्र आवडीचा. पुण्यामुंबईचे आमची तुळशीबाग, आमचं अमुकढमूक म्हणायचे तेव्हा सखी म्हणायची, 'हॅहॅहॅ, आमचा महाद्वार रोड जगात भारीय! तिथं सगळं मिळतं. तिथं सगळ्यांशी बोलताना नि खरेदी करताना ज्यॅम भारी वाटतं.'

आज अभीदादा शेजारी चालत होता, सखीबरोबर. आपल्याबरोबर येणाऱ्या माणसानं आपल्या मागं नाही तर सोबत चालावं हे सखीला वाटतच राहायचं. आज ते खरं होत होतं. अजूनही सखीकडं सगळे वळून वळून बघत होते. इतक्यात बिनखांबी गणेश मंदिराच्या अलीकडं रस्ता क्रॉस करायची वेळ झाली. सखीनं तर्राट व्हीलचेअर रस्त्यावरून पार केली. दादा, अगंअगं थांब म्हणतच राहिला.

''अगं, क्रॉस करताना डावंउजवं बघत जा. तुझं काही नाही गं, लोक तुला वाचवायच्च्या नादात पडतील दणादणा.''

दादाची काळजी तिला कळत होती, पण आज थांबावंसंच वाटत नव्हतं. जॉयस्टिक... इतकुसा दिसणारा तो इलेक्ट्रॉनिक कोंब. हो... कोंबच! तर तो कोंब हातात आल्यापास्नं वाटत होतं की आता आनंदाची नि जादूची काठी, जशी पऱ्यांकडं असते तशी आपल्या हातातंय. आपण म्हणू ते होणार आपल्या कोल्हापूर नगरीत! आपण आहोत महाराणी!!

भर बाजारात आल्यावर तर सगळेच सखीभवती जमले. विचारायला लागले. त्यांना खूप आनंद झाला होता की सखी स्वत:ची स्वत: आलीय. आज बरोबरच्यांना कुणी विचारतच नव्हतं. सगळ्यांचं एकच मत होतं, ''भारीय वो तुमची गाडी. पेट्रोलवर पळती की बॅटरीवर पळती? किती पळती? कशी थांबती?'' आज सगळी उत्तरं सखी देत होती. एक आजी जॉयस्टिककडं बोट करत म्हणाली, ''हित्तं खंट्रोल हाय जनू?'' सखी म्हणाली, ''हो हो आजी. माझ्या हातात जॉयस्टिक आणि मी करते चेअर कंट्रोल!''

हव्या त्या गाड्याशी जाऊन सखीनं चेअर थांबवली. कानातली



घेतली. गजरे घेतले. एरवी फळांच्या गाडीकडं न वळणारी सखी. आज दादाकडं वळून म्हणाली, ''दादा, फळं चांगली असतात तब्येतीला. कुठली हवीत सांग, घेते.'' रस्ता क्रॉस करताना पुन्हा सखी जोरात गेली. दादा ओरडलाच... तेव्हा शहाण्या आवाजात सखी म्हणाली, ''अरे दादू, ट्राय टू अंडरस्टँड, आजवर तू किंवा इतर कुणी माझी चेअर चालवायचात. आणि तुम्हाला येतातच रस्त्यावरचे सगळे नियम. आज जगात पहिल्यांदाच, माझी मी चालतेय, तर लक्षात नाही राहत, मग चुकतंय. येईल मला. असं समज की आज मी चालायला लागलेय.''

''खरंचंय गं बाई तुझं. हे सगळं नवं तुझ्याइतकंच मलाही समजून घ्यायला हवं. मीही पहिल्यांदाच शिकतोय सगळं. वेळ लागतोय. समजून घे,'' अभी हसत हसत म्हणाला.

महाद्वाररोडवरची फेरी पूर्ण करून येईतो संध्याकाळ झाली होती. चंद्राची पुसटशी कोर आभाळात दिसत होती, ''दादा, बघ आभाळात, चंद्रकोर किती नाजूक ए... बघ नं, आज वाटतंय, हा चंद्र माझा मी बघितलेला, माझा माझा आहे!''

कोपऱ्यावरच्या आईस्क्रीम पार्लरकडे चेअर वळवत सखीनं अभीला खूण केली. दादा लगेच आत जाऊन तिचा आवडता चोकोबार घेऊन आला.

''एका हातात चोकोबार नि एका हातात जॉयस्टिक घेऊन गप्पा मारत पुढं जाणारी सखी भारी दिसतेय!'' असं स्वत:शी म्हणत सखी खुदकन हसली नि तिनं जॉयस्टिकला हलकासा  वेग दिला.



चौथीत असताना मी बैलगाडीखाली पडले नि चालणं, शू-शी कळणं सगळं बंद झालं. त्यावेळी वर्षभर मला मुंबईतल्या चिल्ड्रन्स ऑर्थोपेडिक हॉस्पिटलमध्ये ठेवलं होतं. आईबाबांच्या ओळखीचे भिडे आजीआजोबा तेव्हा मला गरमगरम मऊमऊ तूपमेतकूटभात घेऊन भेटायला यायचे. येताना ते माझ्यासाठी मस्त मस्त पुस्तकं आणायचे. त्या पुस्तकांमध्ये मी अक्षरशः हरवून जायचे...

वर्षभरानं घरी परतल्यावर वेगळं जग सुरू झालं. अंथरूणात सतत झोपून राहावं लागण्याचा तो काळ. तेव्हा जे लोक भेटायला यायचे, ते अगदी कुकुल्यांना विचारतात तसा गोड आवाज लावून विचारायचे, 'कशी आहेस?' 'काय खाऊ हवा तुला?' पण खरं सांगू... असं विचारण्याचा रागच येत गेला मला. वाटायचं, लहान असलो तरी आम्हा मुलांना सग्गळं कळतं!

आजही मला तस्संच वाटतं. लहान मूल ही एक स्वतंत्र विचार करू शकणारी व्यक्ती असते असं मी मानते. त्याचमुळे 'जॉयस्टिक'मधल्या गोष्टींमध्ये भेटणारी जाई, चारू, डेविड, सोहा, अनय, कुणाल अशी सगळी लहान मुलं निरागस; पण स्वत:चं आकलन असणारी आहेत. अगदी तुमच्या-माझ्यासारखी! म्हणूनच मला वाटतं, ही मुलं आणि त्यांच्या निखळ, निरागस गोष्टी तुम्हाला नक्की आवडतील.

– सोनाली नवांगुळ



**मा ऊ स** मल्टिमीडियाचं प्रकाशन